
रायगड, नवी मुंबई
वर्ष १८ ◆ अंक २४२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ शनिवार, २१ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
पनवेल महापालिकेची करवसुली मोहीम/२
श्रीवर्धनमध्ये भटक्या श्वानांचा कहर/५
चिरले संघाने बिग बॅश ट्रॉफी जिंकली/८

## तीनशेहून अधिक बेकायदेशीर जुगार आणि बेटिंग ॲप ब्लॉक



**नवी दिल्ली :** देशातील वाढत्या बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि सट्टेबाजीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने एका मोठ्या कारवाईत ३००हून अधिक बेकायदेशीर बेटिंग वेबसाइट्स आणि मोबाइल ॲप्सवर बंदी घातली आहे. या धडक कारवाईमुळे ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या जाळ्यांचे कंबरडे मोडले असून डिजिटल माध्यमांतून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला लगाम बसण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार सरकारकडून बेकायदेशीर सट्टेबाजींविरोधातील मोहीम गेल्या काही काळापासून सातत्याने राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत आतापर्यंत एकूण सुमारे ८,४०० वेबसाइट्सवर कारवाई करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने लागू केलेल्या नवीन 'ऑनलाइन गेमिंग' नियमानंतर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे.

# समतामूलक समाजाचा संकल्प करूया

## ▪ चवदार तळे सत्याग्रहाच्या वर्धापनदिनी मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समतेचा, सामाजिक न्यायाचा आणि संविधानिक मूल्यांचा पुनरूच्चार करत भेदभावमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. महामानव बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवतेच्या प्रतिष्ठेसाठीचा लढा होता, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाड येथे चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शताब्दी वर्षाची सुरुवात शुक्रवारी (दि.२०) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी चवदार तळ्याचे जलशुद्धीकरण आणि परिसराचे सुशोभीकरणासाठी ५५ कोटी ८० लाख निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, उद्योग व मराठी भाषामंत्री डॉ.उदय सामंत, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, रोजगार हमी योजना फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रवीण दरेकर, महाडचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि राज्यभरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यावेळी चवदार तळ्याच्या ठिकाणी असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृत पुतळ्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करून मानवंदना देण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत आपल्या भाषणाची सुरुवात करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सन १९२३मध्ये सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याचा कायदा झाला असला तरी समाजातील काही घटकांनी त्याची अंमलबजावणी रोखली. या अन्यायाविरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला चवदार तळे सत्याग्रह हा सामाजिक समतेचा क्रांतिकारी टप्पा ठरला. हा संघर्ष केवळ पाणी पिण्यासाठी नव्हता, तर विषमता आणि अस्पृश्यतेच्या व्यवस्थेविरुद्ध उभारलेला मानवतेचा लढा होता, असे त्यांनी अधोरेखित केले. या सत्याग्रहामुळे देशातील सर्व सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले झाले आणि समतेची पायाभरणी झाली, असे सांगत त्यांनी पुढील पिढीपर्यंत हा संघर्षाचा इतिहास पोहचविण्याची गरज व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी चवदार तळ्याच्या सुशोभीकरणाच्या कामाचा उल्लेख करीत हे ठिकाण स्वच्छ, पवित्र आणि प्रेरणादायी स्वरूपात विकसित केले जाईल, असे सांगितले तसेच राज्य सरकारतर्फे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अनुसूचित जातींवरील अत्याचारातील पीडित कुटुंबातील ९८ जणांना शासकीय नोकऱ्या देण्याचा निर्णय, पीपल्स एज्युकेशन सोसायटीला दिलेला निधी, चैत्यभूमीवरील स्मारकाचे काम तसेच लंडन व जपानमध्ये बाबासाहेबांच्या स्मृती जपण्यासाठी केलेल्या उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला. याशिवाय, बौद्धगया येथे महाराष्ट्र भवन उभारण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. बाबासाहेबांच्या नावाने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अध्यासन स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान हक्क दिले आहेत. या संविधानामुळेच भारत प्रगतीच्या मार्गावर आहे. त्यामुळे विषमता आणि अस्पृश्यता संपवून समतामूलक समाज निर्माण करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या काव्य शैलीत भाषणाची सुरुवात केली. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर भव्य भीमसृष्टी स्मारक उभारण्याची मागणी त्यांनी केली. **(पान २ वर..)**



### सुशोभिकरणाचे भूमिपूजन, नोकरी आदेशाचे वितरण

चवदार तळ्याचे जलशुद्धीकरण आणि परिसराच्या सुशोभिकरणासाठी ५५ कोटी ८० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. या ऐतिहासिक स्थळाचा जागतिक दर्जावर विकास करण्यावर भर देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जातिवाचक अत्याचाराने दुर्दैवी मृत्यू झालेल्यांच्या ९८ वारसांना शासकीय सेवेत नियुक्तीचे आदेश वितरण करण्यात आले. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

## भोंदूबाबा अशोक खरातचे बिंग फोडणारा ऑफिस बॉय ताब्यात

**नाशिक : प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरातचे आक्षेपार्ह व्हिडीओ बाहेर काढणारा ऑफिस बॉय नीरज जाधवला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व्हिडीओ बाहेर काढून खंडणी उकळण्याचा आणि खरातसह महिलांना ब्लॅकमेल केल्याचे तपासात समोर आले आहे.

नीरज जाधव हा अशोक खरात याच्याकडे ऑफिस बॉय म्हणून काम करत होता. याच काळात त्याने खरात याचे महिलांसोबतचे काही आक्षेपार्ह व्हिडीओ आपल्याकडे घेतले. हे व्हिडीओ व्हायरल करण्याची भीती दाखवून तो धमकावत होता. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याने या संपूर्ण प्रकारात आणखी माहिती उजेडात येण्याची शक्यता आहे.

### रूपाली चाकणकर यांचा राजीनामा

अशोक खरात प्रकरणात आरोप झालेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष व राष्ट्रवादीच्या नेत्या रूपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला आहे. याबाबतचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानंतर चाकणकरांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे राजीनामा दिला.

## गडचिरोलीत ११ जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण

**गडचिरोली : प्रतिनिधी**

एकेकाळी माओवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात आता या चळवळीचे अस्तित्व संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. पोलीस दल आणि सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांनी ११ जहाल माओवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. आत्मसमर्पण केलेल्या या माओवाद्यांवर महाराष्ट्र शासनाने एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये अनेक वरिष्ठ कॅडरचे सदस्य आहेत, ज्यामुळे नक्षलवादी संघटनांच्या कार्यप्रणालीला मोठा तडा गेला आहे. या माओवाद्यांमध्ये सोनी ऊर्फ बाली वत्ते मट्टामी, बुदरी ऊर्फ रामबत्ती आयतु मट्टामी, सुखलाल बोळगा कोक्सा, शांती ऊर्फ सोमरी गंगा तेलामी आणि यमुनक्का ऊर्फ रुखमाक्का पेंदाम यांचा समावेश होता.

विशेष म्हणजे यमुनक्का पेंदाम हिच्यावर २७ गंभीर गुन्हे दाखल असून ती १९८२पासून चळवळीत सक्रिय होती. याशिवाय गणेश कोवासी, मिनको मट्टामी, धनु वेळंजे, सुनिता होयाम, रमेश मडावी आणि किशोर वासम या सदस्यांनीही शरणागती पत्करली आहे.



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून केरळ विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचा प्रचार



**तिरुअनंतपूरम : वृत्तसंस्था**

केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने रणनीती आखली असून कासरगोड विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्यावर सोपवली आहे. त्यानुसार त्यांनी गुरुवार (दि.१९)पासून सहकाऱ्यांसह प्रचाराला जोरदार सुरुवात केली. त्यामुळे स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

पनवेलच्या राजकारणात आपली भक्कम पकड निर्माण करणारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वी पनवेल महापालिका, रायगड जिल्हा परिषद तसेच पनवेल पंचायत समिती निवडणुकीत दमदार कामगिरी करत विरोधकांना अक्षरशः चारीमुंड्या चीत केले. या सलग विजयांमुळे त्यांनी एकहाती वर्चस्व प्रस्थापित करत संघटन कौशल्याची प्रभावी छाप पाडली.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या या यशस्वी कामगिरीची दखल घेत भाजप पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर प्रदेश चिटणीसपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली. त्यानंतर आता **(पान २ वर..)**






**पुणे : राजहंस प्रकाशनचे दिलीप माजगावकर यांना सलग चौथ्या वर्षी साहित्य अकादमीचा उत्कृष्ट प्रकाशन पुरस्कार आणि एकूण शंभरावा पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल रायगडचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी मराठी साहित्य परिषदेचे संचालक सुनील महाजन आणि ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे उपस्थित होते.**

## कुंडलिका समुद्र खाडीत शिडाच्या होड्यांची शर्यत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे एकविरा मातेची नारळाची ओटी भरण्याच्या निमित्ताने आयोजित पारंपरिक शिडवाल्या होड्यांच्या शर्यतीचा थरार कुंडलिका समुद्र खाडीत असंख्य इंजिन होड्यांच्या जत्रोत्सवाने रंगला. या स्पर्धेत आग्राव येथील गुरूदास कामत यांच्या हिरावती या शिडवाल्या होडीने प्रथम क्रमांक पटकाविला.

यंदाही गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी आग्राव दर्यातरंग मित्र मंडळ पूर्वापाडा यांच्या वतीने शिडवाल्या होड्यांची जंगी शर्यत आग्राव जेटी येथून दुपारी १२ वाजता सुरू झाली. या वर्षी एकूण आठ होड्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता, तर सोबतीला असंख्य इंजिन होड्या स्थानिक कोळी बंधू-भगिनी आणि पै-पाहुण्यांसह कुंडलिका समुद्र खाडीत होत्या. **(पान २ वर..)**



# कोकणातील दुर्गम भागांमध्ये ऊर्जेचे नवे पर्व सुरू होणार

## लघु जलविद्युत विकास योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी लघु जलविद्युत विकास योजनेला अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी राबवल्या जाणाऱ्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुर्गम व डोंगराळ भागांत वीज निर्मितीला मोठी गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

लघु जलविद्युत विकास योजनेसाठी केंद्र सरकारने २,५८४.६० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. यातून देशभरात सुमारे १,५०० मेगावॅट क्षमतेचे नवीन प्रकल्प उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र आणि इतर राज्यांमधील प्रकल्पांसाठी प्रति मेगावॅट २.४ कोटी रुपये किंवा एकूण प्रकल्प खर्चाच्या २० टक्के (कमाल २० कोटी रुपये) आर्थिक सहाय्य केंद्र सरकारकडून दिले जाणार आहे. १ मेगावॅट ते २५ मेगावॅट क्षमतेचे लहान आणि पर्यावरणपूरक प्रकल्प या योजनेचा मुख्य भाग राहाणार आहेत.

या योजनेचा सर्वाधिक फायदा महाराष्ट्रातील कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांसह पश्चिम महाराष्ट्रातील घाटमाथ्यावरील जिल्ह्यांना होण्याची मोठी शक्यता आहे. हे प्रकल्प रन-ऑफ-रिव्हर (नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर आधारित) असल्याने यात मोठ्या धरणांची किंवा विस्थापनाची समस्या येणार नाही. कोकणातील बारमाही वाहणाऱ्या नद्या आणि ओढ्यांवर हे प्रकल्प उभारून स्थानिक पातळीवर विजेची गरज भागवता येवू शकणार आहे.

या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे देशभरात अंदाजे ५१ लाख मनुष्य-दिवस रोजगार निर्माण होणार आहेत. विशेष म्हणजे, या प्रकल्पांमध्ये वापरली जाणारी सर्व यंत्रसामग्री १०० टक्के भारतीय बनावटीची असणे बंधनकारक करण्यात आले आहे, ज्यामुळे आत्मनिर्भर भारत मोहिमेला बळ मिळणार आहे.

# थकित मालमत्ता कर वसुलीसाठी पनवेल महानगरपालिकेची मोहीम

## ६३ मालमत्तांवर अटकावणी कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका हद्दीतील सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेने धडक मोहीम सुरू केली आहे. दिनांक २० मार्च २०२६ पर्यंत एकूण मागणी २२८९.७३ कोटी रुपये इतकी असून, त्यापैकी ६७०.२६ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. उर्वरित १७६४.५५ कोटी रुपये वसूल करण्यासाठी मालमत्ता कर विभागाकडून धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे.

महापालिका प्रशासनाच्या वतीने थकबाकी वसुलीसाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये थकबाकीदार नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे रिक्षाद्वारे जाहीर आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी शनिवार, रविवार व शासकीय सुट्टयांच्या दिवशीही कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

वसुली वाढविण्यासाठी १३ स्वतंत्र वसुली पथके कार्यरत करण्यात आली आहेत. थकबाकीदारांना प्रत्यक्ष भेट देऊन नोटीस वितरण व जप्ती (अटकावणी) कारवाई करण्यात येत आहे.दिनांक १८ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आलेल्या कारवाईनुसार कामोठे , कळंबोली, खारघर, पनवेल, उपविभाग नावडे या नोटमध्ये एकूण १४०३ नोटिसा बजावण्यात आल्या असून ६३ अटकावणी कारवाया करण्यात आल्या आहेत.

तसेच, थकबाकीदारांची यादी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्याची कार्यवाही सुरू असून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी पत्रके, सोशल मीडिया व स्टिकर्सच्या माध्यमातून मोहीम राबविण्यात येत आहे.

महापालिकेच्या वतीने नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरल्यास २% सवलत देण्यात येत आहे





**महाड : पनवेलचे माजी नगरसेवक स्व.एम.एस. जाधव यांच्या सौजन्याने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, क्रांतीभूमी विचारमंच आणि खुटील ते गोमेंडी तरुण बौद्ध विकास मंडळातर्फे चवदार तळे येथे आलेल्या भीम अनुयायांना भोजनदान आणि पाणीवाटप करण्यात आले. या वेळी भाजप अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष व माजी जि.प. सदस्य अमित जाधव, लक्ष्मण जाधव आदी उपस्थित होते.**

## नवीन पनवेलमध्ये ज्ञानाची गुढी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शैक्षणिक समूह संचलित, श्री.बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल येथे यंदाही ज्ञानाची गुढी उत्साहात उभारण्यात आली. प्रतिवर्षीप्रमाणे पुस्तकांची गुढी उभारून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची उपासना, वाचनाची आवड आणि बौद्धिक समृद्धी यांचा संदेश देण्यात आला. गुढीपाडव्याच्या या मंगल पर्वावर ज्ञानाची ही गुढी म्हणजेच उज्ज्वल भविष्यासाठीचा दीपस्तंभ ठरली. संस्थेचे चेअरमन धनराज विसपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. प्राचार्या डॉ. सीमा कांबळे, ग्रंथपाल प्रिया सागरे तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी सहभागी झाले होते.



## टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**पनवेल : वार्ताहर**

टेम्पोने दुचाकीला दिलेल्या धडकेत २८ वर्षीय रोहित लखदिवे हा जखमी झाला. याप्रकरणी अनोळखी टेम्पो चालकाविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहित लखदिवे (रा. घाटकोपर, मुंबई) हा मोटरसायकल वरून पुणे येथे गेला होता. तो असता रात्री जुना मुंबई-पुणे महामार्गावरून जात असताना गोदरेज सिटी ठोंबरेवाडी, पनवेल येथे आला असता टेम्पोने त्याला धडक दिली.



**माणगाव : रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या तसेच तालुक्यातील ग्रामीण भागातील विविध प्रलंबित विकासकामे याबाबत सकारात्मक चर्चा केली. यावेळी माणगाव तालुका अध्यक्ष परेश सांगले उपस्थित होते.**

## पारा ३७ अंशांकडे; उष्माघाताचा धोका

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून तापमानाचा पारा ३७ अंशांच्या पार गेला आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. एप्रिल आणि मे महिन्यात तापमानाचा पारा ४२ ते ४४ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. आरोग्य यंत्रणांना सतर्क करण्यात आले असून प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये विशेष 'उष्माघात कक्ष' कार्यान्वित करण्यात आले आहेत.

यावर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच उन्हाचा तडाखा जाणवायला सुरुवातझाली आहे. यात मागील काही दिवसांपासून कमालीची उष्णता वाढली आहे. सध्या तापमानाचा पारा ३४ ते ३७ अंशावर पोहोचला आहे. उष्णतेच्या त्रासापासून वाचायचे असेल तर काळजी घेण्याच्या सूचना आरोग्य विभागाने दिल्या आहेत. महत्वाचे म्हणजे नागरीकांनी आपली घराबाहेरील कामे सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेत करावीत. दुपारी १२ ते ४ या वेळेत प्रखर सूर्यप्रकाशात फिरणे टाळावे. उघड्यावरील थंड पेये, कापलेली फळे किंवा खाद्यपदार्थ खाणे टाळावे. डिहायड्रेशनचा त्रास टाळण्यासाठी कडक उन्हात शारीरिक कष्टाची कामे टाळावीत. एखाद्या व्यक्तीला उष्माघाताचा त्रास झाल्यास रुग्णाला तत्काळ सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवून बसवावे. अंगावरील कपडे सैल करून शरीरावर थंड पाणी शिंपडावे. ओल्या कापडाने संपूर्ण अंग पुसून काढावे. रुग्ण शुद्धीवर असल्यास त्याला पिण्यासाठी पाणी किंवा 'ओआरएस' द्यावे, अशा सूचना आरोग्य विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

**उष्माघाताची लक्षणे**

*त्वचा कोरडी आणि लालबुंद होणे, घाम येणे अचानक बंद होणे.चक्कर येणे, मळमळणे, पोटदुखी किंवा तीव्र डोकेदुखी जाणवणे. ओठ सुजणे आणि पापण्यांच्या त्वचेचा रंग बदलणे. शरीराचे तापमान ३८.१ अंशांपेक्षा जास्त वाढणे.बारीक ताप, सर्दी, खोकला किंवा घसा खवखवणे.*

**जिल्हयातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शिवाय ओआरएस पावडरचा पुरेसा साठा करून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. नागरीकांनी दुपारच्या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये.**

**-डॉ. प्राची नेहुलकर, जिल्हा आरोग्य अधिकारी**

## आज रमजान ईद सर्वत्र होणार साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

ईद- ऊल - फित्र म्हणजेच रमजान ईद आज शनिवार दि.२१ मार्च २०२६ रोजी सर्वत्र साजरी होणार आहे.

इस्लामी शाबान महिन्यानंतर पवित्र रमजान महिन्याला प्रारंभ होतो.यावर्षी दि.१८ फेब्रुवारी रोजी चंद्रदर्शन झाल्यावर रमजान महिन्याला सुरुवात झाली.या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे (उपवास) धरीत असतात.तसेच नमाज पठण व कुराण वाचनावर तसेच जकात देणे. (दानधर्म करणे) यावर मुस्लिम बांधवांचा जास्त भर असतो. या महिन्यात रात्रीची इशाची नमाज झाल्यावर तरविहची विशेष नमाज मुस्लिम बांधव अदा करतात.

मशीद व ईदगाहमध्ये मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून ईदची सामुदायिक नमाज अदा करणार आहेत. यावर्षी शुक्रवार दि.२० मार्च रोजी चंद्रदर्शन झाल्याने आज शनिवार दि.२१ मार्च रोजी रमजानची ईद साजरी केली जाणार आहे. या रमजान ईदची सामुदायिक नमाज शनिवारी माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथील जामा मशिदीत सकाळी ८ : ३० वाजता होणार असल्याची माहिती येथील मस्जिद मोहल्ल्याचे अध्यक्ष अब्दुलरहिमान हाजीते यांनी दिली.

## 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा' उपक्रमास प्रतिसाद

**मुरुड : प्रतिनिधी**

गुढीपाडवा निमित्त राबविण्यात आलेल्या 'प्रवेश वाढवा' उपक्रमाला मजगाव येथील जिल्हा परिषद शाळेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेत १०० टक्के विद्यार्थ्यांची नोंदणी पूर्ण करण्यात आली आहे.शिक्षक व ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून गृहभेटी घेऊन पालकांना शिक्षणाचे महत्त्व व शाळेची वैशिष्टे पटवून देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना शाळेत दाखल होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. यामुळे शाळेबाह्य एकही विद्यार्थी राहिला नाही, अशी माहिती मुख्याध्यापका रेश्मा धुमाळ यांनी दिली.या यशाबद्दल गावकऱ्यांकडूनआणि आधिकारी वर्गाकडून शाळेच्या शिक्षकांचे कौतुक करण्यात आले




## खासदार धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पेणमध्ये मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन नगरसेविका पल्लवी कालेकर यांच्या पुढाकाराने व डॉ. जी. डी. पोळ फाउंडेशन यांच्या सहकार्याने रविवार २२ मार्च २०२६ रोजी मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन कन्या शाळा प्रभुआळी येथे करण्यात आले.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टिकोनातून या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात नेत्र तपासणी, बाळ आरोग्य तपासणी,स्त्रियांचे आजार, सर्दी,दमा, श्वसनाचे आजार, मधुमेह तपासणी, डॉ केसकर पॅथॉलॉजीतर्फे रक्त तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून पेन शहर व परिसरातील नागरिकांसाठी या शिबीर ठेवण्यात आले आहे.

हा शिबीर यशस्वी करण्यासाठी अहना राजेंद्र पाटील, कार्यकर्ते परिश्रम घेत असून जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेविका पल्लवी कालेकर यांनी केले आहे.

पान १ वरुन

## समतामूलक समाजाचा संकल्प करूया

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समानता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा पुनरूच्चार करत समाजातील एकजूट अधिक मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले तसेच संविधान अत्यंत मजबूत असून ते बदलण्याच्या अफवा निराधार असल्याचे स्पष्ट केले. देश आणि राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाड येथील चवदार तळ्याच्या विकासासाठी ५५ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे सांगत मंत्री भरत गोगावले यांनी हा प्रकल्प शताब्दी वर्षापूर्वी पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. देशभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी येथे आधुनिक सुविधा निर्माण करण्यावर भर देत रायगड येथे शिवसृष्टी आणि महाड येथे भीमसृष्टी उभारण्याची मागणीही त्यांनी केली तसेच या ऐतिहासिक स्थळांचा सर्वांगीण विकास करून सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक भक्कम करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी प्रास्ताविकात महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याच्या विकासासाठी सुमारे ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून या ठिकाणाचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प व्यक्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची सुरुवात याच ठिकाणाहून झाल्याने या स्थळाला जागतिक स्तरावर नेण्याचा सरकारचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले तसेच शिक्षण, वसतिगृह आणि सामाजिक योजनांद्वारे बहुजन समाजाच्या सक्षमीकरणावर विशेष भर दिला जाणार असल्याचे नमूद केले.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा देशातील पहिला उपक्रम अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील वारसांपैकी छाया अश्विन कांबळे यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मुलींचे शासकीय वसतिगृह, गौरीपाडा, कल्याण, पूनम दिनेश जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, शहापूर, सारिका बलभीम बनसोडे यांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अनुष्का सुरेंद्रकुमार यांना मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, गोधळपाडा, अलिबाग, पूजा नितीन मस्के यांना संत जनाबाई मुलीचे शासकीय वसतिगृह, पुणे धीरज प्रकाश पवार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर अशा एकूण ९८ वारसांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शासकीय सेवेत नियुक्ती आदेश वितरण करण्यात आले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून केरळ विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचा प्रचार

केरळ या आव्हानात्मक राज्यात कासरगोड मतदारसंघाची धुरा देत पक्षाने त्यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा ठाम विश्वास व्यक्त केला आहे.

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सबका साथ, सबका विकास या धोरणावर विश्वास ठेवून जनतेचा आशीर्वाद आणि कार्यकर्त्यांच्या अथक मेहनतीच्या जोरावर कासरगोडमध्ये निश्चितच विजय मिळवू.

## कुंडलिका समुद्र खाडीत शिडावाल्या होड्यांची शर्यत

या स्पर्धेसाठी जि.प.चे माजी उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, माजी पं.स. उपसभापती संदीप घरत, जि.प. सदस्य डॉ. सचिन राऊळ, ओएनजीसीचे अधिकारी पंकज शेट्टी-कोळी, उमेश मोरे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत आग्रावमधील हरिश्चंद्र शेट्टी यांच्या हिरकणी होडीने व्दितीय, कोर्लईतील कमलावती होडीने तृतीय आणि पद्मावती होडीने चतुर्थ क्रमांक पटकाविला. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा



**उरण : वार्ताहर**

उरण शहरात ठीक -ठिकाणी श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळा शुक्रवार (दि. २०) रोजी साजरा करण्यात आला .उरण शहरातील आनंदनगर येथील श्री स्वामी समर्थ मठातसकाळपासूनच विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .सकाळी ८वाजता राज शेखर म्हात्रे व पत्नी यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.सकाळी ९ वाजता श्री गुरु कृपा संगीत परिवार महिला च्या वतीने भजनठेवण्यात आले सकाळी १०.३० वाजता आरती ,सायंकाळी ६.३०वाजता आरती करण्यात आली ,सर्व स्वामी भक्तांनी तीर्थप्रसादाचा लाभ घेतला

### दुखवटा

**मुक्ताबाई मोकल**



**उरण :** महिला सामाजिक कार्यकर्त्या तथा आदर्श गृहिणी मुक्ताबाई लक्ष्मण मोकल यांचे दिनांक १६ मार्च रोजी वयाच्या ७५ वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार २५ मार्च रोजी माणकेश्वर उरण येथे सकाळी ८ वाजता तर उत्तर क्रिया विधी व होम विधी शुक्रवार दिनांक २७ रोजी बोरखार येथे त्यांच्या राहत्या घरी होणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पाच नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.

# पनवेलमधील गॅस सिलिंडर वितरण सुरळीत

## मजुरांसाठी विशेष सुविधा देण्याचे नियोजन

**कळंबोली : बातमीदार**

इराण-अमेरिका युद्धाचे पडसाद जगभर होत असताना त्याचे दूरगामी परिणाम हे सामाजिक व्यवस्थेत दिसून येत आहेत. याचीच परिणीती घरगुती गॅस सिलेंडरवर झाल्याचे प्रकर्षाने सर्व राज्यभर दिसून आले. परंतु पनवेल तालुक्यामध्ये हिंदुस्तान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम च्या गॅस एजन्सीच्या पंधरा वितरकांकडून अगदी नियमानुसार अन सुरळीतपणे गॅसचे वितरण होत असल्याचे पनवेलच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी अश्विनी धनवे यांनी बोलताना सांगितले आहे.

पनवेलमध्ये गॅस सिलेंडरचा जर कोणी काळाबाजार करत असेल तर त्यांच्यावर निश्चितच कायदेशीर कारवाईचा बडगा हा उगारला जाणार असून हातावर रोजचे मिळून रोजचे खाणारे जे मजूर आहेत त्यांना आवश्यक असणाऱ्या गॅस सिलेंडर देण्याबाबतही वरिष्ठांशी चर्चा करून माणुसकी धर्मातून गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्याबाबत प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

इराण अमेरिकेच्या युद्धामुळे समाज जीवनावर विविध विपरीत परिणाम दिसून येत आहेत.या युद्धाचा सर्वाधिक परिणाम हा पेट्रोलजन्य पदार्थ, पेट्रोल,डिझेल, गॅस, रॉकेल याच्या वितरणावर झालेला दिसून येत आहे. पूर्वी सहजरित्या मिळणारे गॅस सिलेंडर आता तब्बल २५ दिवसाच्या बुकिंग नंतर मिळू शकणार आहे. फोनवर संपलेल्या गॅसचे पूर्वी बुकिंग होत होते. परंतु आता भारत पेट्रोलियम व हिंदुस्थान पेट्रोलियम ने याबाबतचे एक ॲपच विकसित करून या ॲपद्वारे आता गॅसचे बुकिंग होणार आहे. ज्याच्या नावावर गॅसचे कनेक्शन आहे त्यांना संबंधित गॅस एजन्सीकडे येऊन



स्वतःच्या चेहऱ्याची केवायसी करावी लागणार आहे. गॅस बुकिंग केल्यानंतर त्याचा संदेशही भ्रमणध्वनीवर आता मिळू लागला आहे.

तरीसुद्धा गॅस आपल्याला मिळेल की नाही या भीतीपोटी नागरिक गॅस एजन्सीच्या कार्यालयात गर्दी करीत असल्याचे दिसून येत आहे. परंतु सद्यस्थितीत व्यवसायिक गॅस सिलेंडरचे वितरण कमी प्रमाणात असल्याने त्याचा परिणाम सर्वत्र झाल्याचे दिसत आहे. गॅस पेट्रोल बाबत नागरिकांमध्ये शंका कुशंका निर्माण झाल्यानंतर पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनीही एक चित्रफीत करून गॅस सिलेंडरचा पुरवठा हा नियमित सुरळीतच होणार असून त्याचा तुटवडा भासणार नाही. नागरिकांनी घाबरून जाऊ नये आणि गॅस एजन्सीचा इथे गर्दी करू नये असे आवाहनही त्यांनी केले होते. त्यांच्याच बरोबर जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, पनवेल महापालिकेचे नगरसेवक,यांनीही नागरिकांना गॅस वितरणाबाबत कोणतीही शंका घेऊ नये, गॅस सर्वांना सुरळीत व नियमित मिळतील असे आवाहनही केले.

पनवेलच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी अश्विनी धनवे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की पनवेल तालुक्यामध्ये सिलेंडरचे वितरण हे नियमित आणि सुरळीत पणे चालू आहे. गॅस धारकांची कोणतीही कुचुंबना होऊ नये म्हणून १५ गॅस सिलेंडर पुरवठादारांकडून फोनच्या ॲपद्वारे नोंदणी करण्यात सुरुवात झाली आहे. नागरिकांनी सिलेंडर बाबत कोणतीही भीती मनात न बाळगता गॅस वितरण कंपनीच्या कार्यालयात विनाकारण गर्दी ही कोणी करू नये. ज्यांचा गॅस सिलेंडर संपत आलेला आहे त्यांना निश्चितच सुरळीत व नियमितपणे गॅस सिलेंडर मिळेल याची योग्य ती तजबीज शासनाकडून अन कंपन्यांकडूनही करण्यात येत आहे. त्यातही मोल मजुरी करून हातावर पोट भरणारे जे मजूर व अन्य कामगार आहेत त्यांनाही पाच किलो पर्यंतचे सिलेंडर पूर्वी जसे सहज मिळत होते तेही आता संबंधित काम करत असलेल्या कंपनीने जर पत्र दिले तर त्यांनाही उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर त्याबाबतचे ही नियोजन करण्यात येत असल्याचे पनवेल तालुक्याचे पुरवठा निरीक्षण अधिकारी अश्विनी धनवे यांनी सांगितले आहे.

## लग्नाच्या साइटवरून ओळख वाढवून फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

लग्नाच्या साइटवरून ओळख वाढवून वेगवेगळ्या अडचणी सांगितल्या आणि दहा लाख ४० हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

३८ वर्षीय महिलेच्या पतीचे निधन झाले असून त्यांनी दुसऱ्या लग्नासाठी एका वेबसाईटवर अकाउंट सुरू केले. यावेळी त्यांना अमन सिंग याचा फोन आला आणि तो युके वरून बोलत असल्याचे सांगितले. त्यांचे व्हॉट्सअपवर बोलणे तसेच चटिंग सुरू झाले. त्यावेळी केनिया येथे जायचे असून पैशांची अडचण असल्याचे त्यांनी सांगितले. त्यावेळी महिलेने वीस हजार रुपये पाठवले त्यानंतर पुन्हा काही रक्कम मागितली. काही दिवसांनी युके येथून इंडियाचे फ्लाईटचे तिकीट काढले असून भारतात येणार आहे. त्यामुळे ऑनलाईनचा प्रॉब्लेम असल्याचे सांगून आणखी काही रक्कम मागितली. असे एकूण दहा लाख चाळीस हजार रुपये पाठवले,

दोन मार्च रोजी एका महिलेने कस्टमर ऑफिसर म्हणून त्यांना फोन केला आणि अमन सिंग याच्यावर मनी लौंडरिंगच कारवाई करणार असल्याचे सांगितले. यावेळी सर्टिफिकेट काढावे लागेल आणि साडेचार लाख रुपये भरावे लागतील असे सांगितले. मात्र त्यांनी ती रक्कम पाठवली नाही आणि एका मित्राला त्यांनी अँटी मनी लॉन्ड्रींग प्रमाणपत्र बाबत विचारले असता अशा कोणत्याही प्रकारचे प्रमाणपत्र नसते असे सांगितल्यावर त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले.

# नगरसेविका विजयश्री पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका विजयश्री पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन गुरुवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर झालेल्या या कार्यक्रमाला भाजपपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. तळोजा फेज- मधील कार्यकर्ते व नागरिकांसाठी हे कार्यालय महत्त्वपूर्ण केंद्र ठरणार असून, स्थानिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच विविध विकासकामांसाठी हे कार्यालय सक्रिय राहील, असे



मत भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी व्यक्त केला. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी`. त्यामध्ये प्रल्हाद केणी, नितेश पाटील, नंदकुमार म्हात्रे, निर्दोष केणी, विनोद पाटील, सचिन पाटील, जितू पोरजी, अशोक पाटील, महेंद्र पाटील, हरिदास पाटील, नितीन भोईर, वासुदेव मढवी, दीपक पाटील, दीक्षा जाधव, मनिषा इंगळे, अनुराधा, गोविंद महाराज मढवी, सोपान पाटील, नवनाथ भोजने, अशोक विरक, सुनील पाटील, चित्रा पाटील, माधुरी पाटील, नीलम मान कामे, प्रदीप पाटील, संतोष पाटील, विजय वागले, राजेश महादे, अविक महादे, देवीदास पाटील आणि देवेंद्र पाटील आदींचा समावेश होता. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी विजयश्री पाटील यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. परिसराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास भाजपचे नेते प्रल्हाद केणी यांनी व्यक्त केला

# पनवेल महापालिकेतर्फे २३ मार्चपासून ज्युनियर केजी प्रवेश प्रक्रिया होणार सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता ज्युनियर केजी वर्गामध्ये प्रवेश देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती महापालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली आहे. इच्छुक पालकांनी नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. २३ मार्च २०२६ पासून सुरू होणार असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि. १७ एप्रिल २०२६ आहे. प्रवेश फॉर्मचे वाटप व स्वीकृती सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत केली जाणार आहे. प्रवेशासाठीची लॉटरी ज्युनियर केजी प्रवेशासाठीची लॉटरी दि. २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी



११ वाजता घेण्यात येणार आहे. चालू शैक्षणिक वर्षात ज्युनियर केजीचा एकच वर्ग सुरू करण्यात येणार असून या वर्गाची एकूण क्षमता ४० विद्यार्थ्यांची (२० मुले व २० मुली) असेल. प्रवेशासाठीची पात्रता प्रवेशासाठी बालकाची वयोमर्यादा दि. १ जुलै २०२१ ते दि. ३१ डिसेंबर २०२२ दरम्यान जन्म झालेली असावी. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२६ रोजी बालकाचे किमान वय ४ वर्षे आणि कमाल वय ५ वर्षे ५ महिने ३० दिवस असणे आवश्यक आहे.

सदर प्रवेश प्रक्रिया केवळ पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे. पालकांनी दिलेली माहिती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. येथे करावा अर्ज प्रवेश अर्ज लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय, दांडेकर हॉस्पिटल व आगरी समाज हॉल समोर, पनवेल येथे उपलब्ध होणार आहेत. अधिक माहितीसाठी संजय गायकवाड (९९३०११९०३०), रोशन पोपेटा (७०४५६७०१०१) व प्राजक्ता महाडिक (८१०८७०७४१७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# गुढीपाडव्याच्या निमित्ताने कळंबोली शहरात निघाली नववर्ष शोभायात्रा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठी नववर्षाच्या गुढीपाडव्याच्या निमित्ताने कळंबोली शहरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर कळंबोलीकरांनी भव्य शोभायात्रेत मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

सालाबादप्रमाणे यंदाही महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीपासून या शोभायात्रेला सुरुवात झाली. शहरातील मुख्य मार्गांवरून निघालेल्या या मिरवणुकीत लहान मुले, शालेय विद्यार्थी तसेच विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील नागरिकांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले. ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या ठेक्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांच्यासह नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी नागरिकांना मराठी नववर्षाच्या शुभेच्छा देत शोभायात्रेचा आनंद लुटला. यावेळी महापौर नितीन पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, कळंबोलीसह संपूर्ण पनवेल महापालिका क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आमचे प्रयतक सुरू आहेत. पायाभूत सुविधा, स्वच्छता, शिक्षण आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून हे शहर आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे, हा आमचा दृष्टीकोन आहे. नागरिकांचा असा उत्स्फूर्त सहभाग हा विकासाच्या वाटचालीसाठी प्रेरणादायी आहे.

# भाजप खारघर मंडळातील विविध पदाधिकाऱ्यांची गुढीपाडव्यादिनी नियुक्ती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

गुढीपाडव्याच्या दिवशी भारतीय जनता पक्ष खारघर मंडळाच्या वतीने विविध मोर्चे, आघाड्या, सेल व प्रकोष्ठ यांच्या अध्यक्ष व संयोजक पदांसाठी नियुक्ती पत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी मंडळ अध्यक्ष व नगरसेवक प्रवीण पाटील यांनी उपस्थितांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देत नव्याने नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि संघटनात्मक कार्य अधिक जोमाने करण्याचे आवाहन केले.

यावेळी सरचिटणीस दीपक शिंदे यांनी सांगितले की, भाजप हा जगातील अग्रगण्य संघटना असून विचारधारेमुळे देश विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. कोणतेही पद लहान किंवा मोठे नसते, तर दिलेल्या जबाबदारीतून त्या पदाला मोठेपणा प्राप्त करून देण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये असावी. प्रामाणिक प्रयत्न केल्यास आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह संपूर्ण खारघर मंडळ कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमात विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. अनुसूचित जमाती मोर्चा अध्यक्ष पदी दत्ता कांबडी, ओबीसी मोर्चा अध्यक्ष उमेश पाटील, दक्षिण भारतीय सेल संयोजक रामकृष्णन, उत्तर भारतीय सेल संयोजक शैलेंद्र त्रिपाठी, जैन प्रकोष्ठ संयोजक सचिन शहा, सोशल मीडिया संयोजक आनंद झाने, सहकार सेल संयोजक म्हातारदेव खामकर, आयटी संयोजक अक्षय पाटील, भटके विमुक्त आघाडी विठ्ठल घोलवे, सांस्कृतिक सेल संयोजक दीपक ठाकूर, वाहतूक सेल संयोजक गणेश सांगळे, बुद्धिजीवी सेल संयोजक डॉ. राकेश सोमाणी, व्यापार आघाडी संयोजक अंबालाल पटेल, शिक्षक सेल संयोजक दुर्गादेवी अंजुरे, ज्येष्ठ नागरिक सेल संयोजक सत्यपाल चुग, दिव्यांग सेल संयोजक नवनाथ गाढवे, क्रीडा प्रकोष्ठ संयोजक अशोक पाटील, उद्योग आघाडी संयोजक राजेंद्र मांजरेकर, पदवीधर प्रकोष्ठ संयोजक आदेश भोईर, राजस्थान प्रकोष्ठ संयोजक सुशीला शर्मा, बेटी बचाओ बेटी पढाओ संयोजक गायत्री महापात्रा, अभियंता सेल संयोजक जयदीप गिरासे तसेच मन की बात प्रमुखपदी भारती बांदेकर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

खारघर भाजपा जनसंपर्क कार्यालय येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास सरचिटणीस ॲड. नरेश ठाकूर, उपाध्यक्ष ॲड. अमर उपाध्याय, ब्रिजेश पटेल, सचिव अनिता जाधव, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.




## जुन्या पैशाच्या वादातून मारहाण; गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** जुन्या पैशाच्या वादातून ४८ वर्षीय इसमाला मारहाण केल्या प्रकरणी बालाजी गंगनमले आणि नवनाथ गंगनमले यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात १७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

ईश्वर हिप्परकर हे कळंबोली सेक्टर २० येथे राहत असून त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे.बालाजी गंगनमले हे त्यांच्या ट्रान्सपोर्ट मध्ये भागीदार होते.मात्र पैशांमुळे वाद झाल्याने भागीदारी तोडली. १४ मार्च रोजी पाच नंबर पार्किंग कळंबोली येथे बालाजी गंगनमले याने माझे पैसे कधी देणार यावरून ईश्वर यांना शिवीगाळ केली व नवनाथ याने नाकावर जोरात बुक्की मारली.

त्यामुळे त्यांच्या नाकपुड्यातून रक्त आले. त्यानंतर नवनाथ याने काठीने मारहाण केली. त्यानंतर त्यांना एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे दाखल करण्यात आले.



**कामोठे : येथील वर्धमान भवन सेक्टर १८ या सोसायटीमध्ये श्री गणपती बाप्पाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत उपस्थित होते. सोसायटीचे अध्यक्ष विठ्ठल शिंगाडे, सेक्रेटरी श्रीकांत कास्वीद व या सोसायटीमधील सर्व रहिवाशांनी डॉ. भगत यांचे स्वागत केले**

**करंजाडे : डॉ. हिमांशू बेलोटे यांच्या श्री क्लिनिक या दवाखान्याचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गोरख प्रभू बेलोटे, नंदा बेलोटे, डॉ. कुणाल बेलोटे, डॉ. हेतल बेलोटे, डॉ. आशिष मोकल व इतर मान्यवर उपस्थित होते.**



# पनवेल रेल्वे स्टेशन परिसराचा श्वास कोंडतोय!

**नवीन पनवेल :** जंक्शन होत असलेल्या पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सध्या बेकायदेशीर झोपड्या तसेच घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या ठिकाणाहून ये-जा करणाऱ्या प्रवासी, नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

पनवेल रेल्वेस्थानक परिसरातून तक्काकडे जाणाऱ्या रस्त्यावरील फुटपाथवर अनेक बेकायदेशीर झोपड्या उभारण्यात आले आहेत. फुटपाथवरच अनोळखी नागरिकांनी आपल्या मुलाबाळांसह संसार थाटल्याने पादचाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे. मात्र पनवेल



महानगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात अनेक मोठमोठ्या इमारती उभ्या राहत आहेत. याच रेल्वे स्टेशन परिसरातून अनेक नागरिक कामानिमित्त हजारोंच्या संख्येने येजा करत असतात. पनवेल हे जंक्शन रेल्वे स्टेशन होत आहे, मात्र या स्टेशनच्या आजूबाजूच्या परिसरात बेकायदेशीर झोपड्या उभ्या राहत आहेत. त्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्या ठिकाणी झोपड्यांमध्ये राहणारे नागरिक कुठून आले आणि कोण आहेत याचा देखील थांगपत्ता नाही. त्यामुळे गुन्हेगारीच्या घटना वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पनवेल महानगरपालिका आणि पनवेल शहर पोलिसांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

फूटपाथवर उभारण्यात आलेल्या बेकायदेशीर झोपडपट्टीतील मुले याच ठिकाणी असलेल्या रेल्वे स्टेशन जवळील सर्कल जवळ उभे असतात. त्यामुळे येण्या जाणाऱ्या प्रवाशांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. अनेकदा प्रवाशांची वाटदेखील अडवल्याच्या घटना ताज्या आहेत

## संपादकीय

# ‘अवकाळी’चा तडाखा

एकीकडे मार्च महिन्यातच तापमानात झालेली प्रचंड वाढ राज्यभरात जाणवत असताना गेल्या तीन दिवसांपासून मराठवाड्यासह विदर्भ व मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने व गारपिटीच्या माऱ्याने थैमान घातले आहे. काढणीला आलेल्या पिकांच्या व फळबागांच्या मोठ्या नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या या नुकसानीची गंभीर दखल घेऊन त्यांना लवकरात लवकर मदत करण्याची गरज आहे.

**गेल्या वर्षी पुराच्या फटक्यामुळे राज्याच्या अनेक जिल्ह्यांतील शेतीचे मोठे नुकसान झाले होते. यंदा तर मार्च महिन्यातच अवकाळी व गारपिटीचा तडाखा मराठवाडा, विदर्भ व मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना बसला असून गेल्या तीन दिवसांत अनेक भागांमध्ये काढणीला आलेला गहू, ज्वारी व फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून ऑक्टोबर ते मार्च दरम्यानही पावसाने झोडपून काढण्याच्या घटनांमध्ये वाढ दिसते आहे. दरवर्षी येऊ लागलेल्या अवकाळी पावसाने शेती व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. जागतिक तापमानवाढीमुळे वाऱ्यांचे स्वरुप बदलू लागले असून त्याचा परिणाम पावसाचे चक्र बिघडण्यात होतो आहे असे दिसते. अरबी समुद्र परिसरातील वाढीव आर्द्रतेमुळे महाराष्ट्रात अचानक पाऊस पडतो असे सांगितले जाते. पिके कापणीला आलेली असताना अचानक जोरदार पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्याचा हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला जातो. सोशिक असला तरी शेतकऱ्याला पुन्हा पुन्हा असे नुकसान सोसणे अशक्यप्राय होऊन बसते आहे. गेले तीन दिवस मराठवाड्यात लातूर, धाराशीव जिल्ह्यात गारपीट झाली तर नाशिक जिल्ह्यात गुरुवारी सलग दुसऱ्या दिवशीही अवकाळी पावसासह गारपिटीचा मारा सुरू राहिला. नाशिक जिल्ह्यात गहू, द्राक्ष आणि कांदा पिकाचे नुकसान झाले आहे. आधीच कांद्याचे बाजारभाव घसरले असताना अवकाळी पावसामुळे दुहेरी संकट ओढवल्याचे शेतकरी सांगत आहेत. मराठवाड्यातील लातूर, धाराशीव जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात गारपीट झाली असून बीड व जालना जिल्ह्यातही गारांच्या पावसामुळे नुकसान झाले आहे. येथे काढणीला आलेला गहू, हरभरा पिकाचे नुकसान झालेले दिसते. सातारा आणि सांगली जिल्ह्यातही गेले तीन दिवस अवकाळी पावसाचे थैमान सुरू आहे. या पावसाने द्राक्षांसह आंबा, डाळिंब या पिकांनाही फटका बसला आहे. रब्बीतील २० ते ३० टक्के गहू पीक अजून शेतात उभे असून पावसाने त्याचे नुकसान झाले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात जोरदार पावसामुळे केशर आंब्याचे मोठे नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्ह्यातही वादळीवाऱ्यासह आलेल्या पावसामुळे आंबा, केळी, पपई आदी फळबागांची मोठी हानी झाली आहे. उन्हाळी ज्वारीलाही येथे फटका बसलेला दिसतो. अनेक ठिकाणी शेतांमध्ये पिके जमीनदोस्त झाली असून काही ठिकाणी गारांचा थरही दिसतो आहे. सुयोग्य मार्गदर्शनाशिवाय शेतकऱ्यांना अशा बेभरवशाच्या हवामानचक्रात शेती करणे दिवसेंदिवस जिकिरीचे होत चालले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांपर्यंत हवामानाचा अंदाज वेळेत पोहचण्याची नितांत गरज आहे. अवकाळी पाऊस आता गंभीर समस्येचे स्वरुप धारण करू लागला आहे की काय असा प्रश्न शेतकऱ्यांना पडतो आहे. त्या संदर्भात दीर्घकालीन उपाययोजनांवरही विचार व्हायला हवा. शेतकऱ्यांसाठीच्या पीकविमा योजनांमध्ये या बदलत्या परिस्थितीनुसार बदल आवश्यक असून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीकडेही बारकाईने लक्ष दिले जायला हवे. योग्य पीक पद्धतीबद्दल कृषीतज्ज्ञांचे मार्गदर्शन सर्वसामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहचल्यास त्याला आधार मिळू शकेल.**

# महसूल सेवा आता थेट नागरिकांच्या दारी..!

सर्वसामान्य जनता आणि शेतकरी यांचे महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न त्वरित निकाली काढणे महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील नवीन तरतुदींची जनजागृती करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे आणि नागरिकांना ‘Single Day Service Delivery’(एकाच दिवसात सेवा) पुरविणे, या उद्देशाने मार्च ते मे २०२६ या कालावधीत राज्यात महसूल मंडळ स्तर तसेच नगर परिषद व नगर पंचायत पातळीवर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा–१ राबविण्यात येत आहे.

**अभियानाचे वेळापत्रक**

या अभियानांतर्गत महसूल मंडळ आणि नगर परिषद/पंचायत स्तरावर खालीलप्रमाणे एक दिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात करण्यात येणार आहे. (टीप: ज्या तालुक्यांमध्ये महसूल मंडळांची संख्या ६पेक्षा जास्त आहे, तिथे तारखांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.)

**पूर्वतयारीसाठी मार्गदर्शक सूचना**

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पूर्वतयारीच्या कालावधीत खालील प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आले आहेत...

* जमीन वर्ग बदल : भोगवटदार वर्ग–२ जमिनींचे वर्ग–१ मध्ये रूपांतर करण्याच्या प्रकरणांची तपासणी करून, प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत आणि अद्ययावत ७/१२ लाभार्थ्यांना वितरित करावेत.
* जिवंत ७/१२ मोहीम: सर्व गावांमध्ये ७/१२ वाचन पूर्ण करून प्रलंबित नोंदींच्या दुरुस्तीची कार्यवाही शिबिरापूर्वी पूर्ण करावी.
* सामाजिक अर्थसहाय्य : पात्र लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेऊन, समितीच्या बैठकीद्वारे लाभ मंजूर करावेत आणि शिबिरात मंजुरी आदेशांचे वाटप करावे.
* तुकडेबंदी कायदा : १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंतच्या प्रमाणभूत सीमेपेक्षा कमी क्षेत्राच्या जमिनींच्या हस्तांतराची गावनिहाय यादी तयार करून, फेरफार नोंदी अद्ययावत कराव्यात.
* विद्यार्थी दाखले : शाळांमध्ये ’कॅम्प मोड’वर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेऊन शिबिराच्या दिवशी दाखल्यांचे वाटप करावे.
* पाणंद रस्ते व पट्टे वाटप : पाणंद रस्त्यांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावेत आणि ’सर्वांसाठी घरे’ योजनेअंतर्गत पट्टे वाटपाची प्रक्रिया पूर्ण करावी.

**शिबिरामध्ये उपलब्ध होणाऱ्या सेवा**

प्रलंबित फेरफार : विवादग्रस्त फेरफार नोटिसा बजावून शिबिराच्या दिवशी निकाली काढावेत.

* अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क : ७/१२ मधील चुका दुरुस्त करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाचा कर्मचारी उपस्थित राहील. डिजिटल ७/१२ व ८–अ उतारे तत्काळ उपलब्ध करून दिले जातील.
* लोकसेवा हक्क कायदा : उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन–क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारणे व प्रमाणपत्रे वितरित करणे.
* अकृषक (NA) तरतुदींबाबत मार्गदर्शन:

१. कलम ४२ मधील सुधारणेनुसार, विकास आराखड्यात समाविष्ट जमिनींसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नसल्याबाबत नागरिकांना माहिती देणे.

२. संपुष्टात आलेल्या सनद प्रणालीबाबत (कलम ४२–अ, ब, क, ड) जनजागृती करणे.

३. एकवेळचे अधिमूल्य (जपश–ींळाश झीशार्ळीा) भरण्याच्या नवीन व्यवस्थेबाबत मार्गदर्शन करणे (दर: १ हजार चौ.मी.पर्यंत – ०.१%, ४ हजार चौ. मी. पर्यंत – ०.२५%, ४ हजार पेक्षा जास्त – ०.५%).

४. क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ च्या कायदेशीर वैधतेबाबत माहिती देऊन महाभूमी पोर्टलच्या वापरासाठी प्रोत्साहन देणे.

* कमी–जास्त पत्रके (घगझ): भूसंपादन केलेल्या आणि अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन गाव दप्तर अद्ययावत करावे.
* एक खिडकी व्यवस्था (Single Window): सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहून नागरिकांना त्वरित सेवा देतील.

**अंमलबजावणीसाठी जबाबदाऱ्या**


या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. मंत्री (महसूल) चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती आणि संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तारखांची प्रसिद्धी करावी, तर उपविभागीय अधिकाऱ्यांनी पर्यवेक्षणाची जबाबदारी पार पाडावी. तहसिलदारांनी सर्व विभागांच्या समन्वय बैठका घेऊन, लोकप्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने शिबिरांचे यशस्वी आयोजन करावे, अशा सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

हे अभियान अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक पद्धतीने राबवून, कोणत्याही नागरिकाला त्रास होणार नाही याची सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांनी दक्षता घेण्याबाबतही शासनाने सूचित केले आहे.

तरी कोकण महसूल विभागात राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी अभियानाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी आणि कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी केले आहे.

**–मनोज सानप, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे/रायगड तथा प्र.उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.**

# सामर्थ्य शब्दांचे




सामर्थ्य शब्दांचे हा लेखिका डॉ. अंजुषा पाटील यांचा स्फूटलेखसंग्रह पाहता क्षणी आवडला. मुखपृष्ठ मार्मिक आणि आकर्षक असून वेगवेगळ्या विषयावरचे लेख वाचकांचे प्रबोधन करतात.

दैनंदिन जीवन जगत असताना लेखिकेला आलेले अनुभव, ओळखीची व अनोळखी माणसे भेटली. त्यातील काही व्यक्तिमत्व जळून पाहता आली. त्यांच्या सहवासातील काही गोड क्षण, प्रसंग, घटना पाहून लेखिकेने आपल्या शब्दरूप विचारांना एकत्र गुंफून अनेक लेख लिहिले आहेत. काही लेख व्हाट्सअप वरील अजय शतकोटी समूहावरील विषयावरचे आहेत. तर काही लेख निसर्ग, विशेष दिन, वाचन, शब्द, भाषा अशा विषयावरचे स्पुटलेख आहेत.

लेखिका डॉ.अंजुषा पाटील या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका असून शिक्षणाविषयी त्यांना जिव्हाळा आहे. वाचनाचा छंद माणसांना वाचण्यापर्यंत गेलेला असल्यामुळे शब्दाशी त्यांचे नाते जुळले आहे. त्यांचा शिक्षकाचा पिंड असल्यामुळे कोणतीही घटना त्या आपल्या लेखणीतून सोप्या भाषेत समजावून सांगतात.

सामर्थ्य रुपी शब्दांना विचारांच्या कोंदणात जणू कलात्मकतेने रचले आहेत. हा स्फूटलेखसंग्रह लेखिकेने वल्लरी प्रकाशनाला अर्पण केला आहे तसेच या पुस्तकाचे ब्लर्ब वल्लरी प्रकाशाचे प्रकाशक व्यंकटेश कल्याणकर यांनी लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, शब्दांना खरंच सामर्थ्य असतं का ? हा प्रश्न प्रत्येक संवेदनशील मनाला कधी ना कधी पडतो, कारण एखादा शब्द सांत्वन करतो तर कधी प्रेरणा देतो, कधी वेदना उलगडतो तर कधी जीवनाला नवा अर्थ देऊन जातो. शब्द म्हणजे केवळ अक्षरांची मांडणी नसून ते अनुभूतीचे, भावनेचे, विचारांचे दरवाजे आहेत. या पुस्तकात विविध अंगाने शब्दांच्या जगाचा प्रवास आहे. शब्दांच्या माध्यमातून लेखिका नित्य नूतन पणे काहीतरी नवीन शिकत असल्याची जाणीव अधिक प्रगल्भ करून देतात. या पुस्तकातून निखळ वाचनानंद तर मिळतोच सोबत काही सामाजिक समस्यांकडेही नव्याने कृतिशील मंथन करण्याची प्रेरणा मिळते.

प्रस्तुत पुस्तक हे शब्द, बाप्पा, भाषा, ललित, पाऊस, मंथन, चिंतन आणि जीवनानुभव अशा नऊ विभागात विभागले आहेत. यातील लेख एखाद्या सहज अनुभवलेल्या विषयावरचे आहेत. ते वाचल्यानंतर त्यातून वाचकाला आयुष्याचा गुण अर्थ शोधायला भाग पाडतात.

लेखिकेची ओघवती भाषाशैली, पटवून देण्याचे कौशल्य वाचकाचे लक्ष वेधून घेते. सदर पुस्तकात लेखिकेने आपल्या प्रभावी लेखणीने, प्रगल्भ विचार व्यक्त करत वेगवेगळ्या विषयांवर ३१ लेख नऊ विभागात साकारले आहेत.

वल्लरी प्रकाशन पुणे या संस्थेच्या टीमने या पुस्तकाचे मार्मिक असे मुखपृष्ठ रेखाटले आहे.

शब्दांचे समर्थ हे पुस्तक वाचून वाचकांना नक्कीच निखळ आनंद मिळेल अशी आशा वाटते.

पुस्तकाचे नाव–सामर्थ्य शब्दांचे, लेखिका–डॉ. अंजुषा पाटील, प्रकाशक–वल्लरी प्रकाशन पुणे, मूल्य–२०० रु., प्रथम आवृत्ती –२०२५


**–डॉ. सुचिता पाटील,** बोरीवली



## बदलते तंत्रज्ञान

# भारतात लॉन्च झाली अनोखी स्मार्ट अंगठी

फिनलंडमधील हेल्थ–टेक कंपनी Oura Healthने भारतात आपली नवीन स्मार्ट रिंग Oura Ring ४ लॉन्च केली आहे. ही रिंग बोटात घातल्यानंतर युजरच्या आरोग्याची सखोल माहिती देण्याचा दावा करते. ग्लोबल मार्केटमध्ये आधीच लोकप्रिय असलेले हे डिव्हाइस आता भारतीय फिटनेस आणि वेअरेबल मार्केटमध्ये आल्याने चर्चेत आले आहे.




Oura Ring ४ची सुरुवातीची किंमत २८,९०० रुपये ठेवण्यात आली आहे. ब्लॅक आणि सिल्व्हर व्हेरिएंट २८,९००, तर ब्रश्ड सिल्व्हर, रोज गोल्ड, स्टील्थ व्हेरिएंट ३९,९०० पर्यंत जाते. ही रिंग १२ वेगवेगळ्या साइजमध्ये उपलब्ध असून १८ मार्चपासून ऑनलाइन तसेच देशभरातील सुमारे १०० Croma स्टोअर्समध्ये विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. कंपनीकडून ५९९ प्रति महिना सब्सक्रिप्शन प्लॅनही दिला जातो, ज्यामुळे अधिक सखोल हेल्थ इनसाइट्स मिळतात.

या स्मार्ट रिंगची सर्वात मोठी खासियत म्हणजे, तिचे प्रगत ‘Smart Sensing’ तंत्रज्ञान. हे अत्याधुनिक अल्गोरिदम आणि रिसर्च–ग्रेड सेन्सर्सवर आधारित असून अत्यंत अचूक डेटा प्रदान करते. कंपनीच्या दाव्यानुसार या तंत्रज्ञानाच्या अचूकतेला University of Tokyo आणि National University of Singapore यांसारख्या संस्थांकडून मान्यता मिळाली आहे. हे तंत्रज्ञान शरीरातील विविध सिग्नल्सचे विश्लेषण करून वैयक्तिक हेल्थ रिपोर्ट तयार करते.

Oura Ring ४मध्ये १८–पाथ मल्टी वेव्हलेंथ PPG सिस्टम दिले आहे, जे सतत बायोमेट्रिक डेटा ट्रॅक करते. हे तंत्रज्ञान रेस्टिंग हार्ट रेट, हार्ट रेट व्हेरिएबिलिटी (HRV), स्लीप स्टेज, बॉडी टेम्परेचर आणि ब्लड ऑक्सिजन लेव्हल मोजते. रात्रीच्या वेळी रेड आणि इन्फ्रारेड LED च्या मदतीने श्वासोच्छ्वास आणि ऑक्सिजन लेव्हलदेखील ट्रॅक केली जाते. याशिवाय, एक्सेलेरोमीटर आणि तापमान सेन्सरमुळे दैनंदिन हालचाली आणि शरीरातील बदलांवरही लक्ष ठेवले जाते.

Oura Ring ४ हलक्या आणि मजबूत टायटॅनियम मटेरियलपासून तयार करण्यात आली आहे. याचे वजन ३.३ ते ५.२ ग्रॅम असून, हे १०० मीटरपर्यंत वॉटर रेसिस्टन्स आहे. याची बॅटरी एका चार्जमध्ये ८ दिवस चालण्याचा कंपनीचा दावा आहे. ही रिंग पूर्ण चार्ज होण्यासाठी सुमारे २० ते ८० मिनिटे घेते. Oura -pp सोबत कनेक्ट केल्यावर वापरकर्त्याला संपूर्ण हेल्थ रिपोर्ट आणि विश्लेषण पाहता येते.

# ख्यातनाम सनईवादक बिस्मिल्लाखाँ



## निमित्त


अखिल भारतीय कीर्तीचे सुप्रसिद्ध सनईवादक व भारतरत्न पुरस्काराचे मानकरी अशी ओळख बिस्मिल्लाखाँ यांची राहिलेली आहे. त्यांचे मूळ नाव कमरूद्दिनखाँ. बिस्मिल्लाखाँ यांचा जन्म २१ मार्च १९१६ रोजी सनईवादकांच्या कुटुंबात बिहार प्रांतातील शहाबाद जिल्ह्यातील (आता बक्सर जिल्हा) दुमराव या गावात झाला. त्यांचे आजोबा रसूल बक्ष हे दुमरावच्या दरबारी सनईवादक म्हणून नोकरीस होते. सनईवादन हा त्यांच्या घराण्याचा कौटुंबिक व्यवसाय असल्यामुळे लहानपणीच त्यांना आपल्या वडिलांकडून खाँसाहेब पैगंबरबक्ष यांच्याकडून सनईवादनाचे संस्कार लाभले. त्यांनी आपल्या मामांकडे खाँसाहेब अलिबक्ष यांच्याकडे वयाच्या सहाव्या वर्षापासून वाराणसी येथे सनईवादनाचे पद्धतशीर शिक्षण घेण्यास सुरुवात केली तसेच विलायत हुसेन आणि सादिक अली यांच्याकडेही त्यांनी संगीताचे धडे घेतले.

बिस्मिल्लाखाँ हळूहळू आपल्या मामांबरोबर साथ करण्यासाठी लग्न तसेच संगीत संमेलनात जाऊ लागले. त्यांनी मामांबरोबर वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी अलाहाबादच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत पहिल्यांदा सनई वादनाचा सार्वजनिक कार्यक्रम केला (१९३०). दुसरा कार्यक्रम लखनौ येथे प्रदर्शनानिमित्त झालेल्या संगीत संमेलनात करून उत्तम वादनाबद्दल सुवर्णपदक मिळवले. तद्वतच १९३७मधील कोलकात्याच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत त्यांनी तीन सुवर्णपदके मिळवून रसिकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. १९३८मध्ये लखनौ येथे ऑल इंडिया रेडिओ केंद्रावर प्रथम कार्यक्रम सादर केला. येथून पुढे त्यांच्या सनई वादनाच्या उज्ज्वल कारकीर्दीला सुरुवात झाली. १९४० साली बिस्मिल्लाखाँ व त्यांचे बंधू खाँसाहेब शमसुद्दीनखाँ यांनी एक संगीत मंडळी स्थापन करून कार्यक्रम सादर करण्यास सुरुवात केली. पुढे अल्पावधीतच प्रथम श्रेणीचे सनईवादक म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला. या दरम्यान कन्नड अभिनेते राजकुमार यांच्या सनादी अप्पण्णा या चित्रपटासाठी त्यांनी सनईवादन केले. सत्यजित राय यांच्या जलसाघर या चित्रपटात त्यांनी भूमिका साकारली.

बिस्मिल्लाखाँ यांच्या असामान्य कलागुणांमुळे १९५५मध्ये त्यांना नॅशनल कल्चरल ऑर्गनायझेशन या राष्ट्रीय सांस्कृतिक संघटनेकडून अखिल भारतीय शहनाई चक्रवर्ती हा किताब मिळाला. १९५६मध्ये संगीत नाटक अकादमीतर्फे सन्मान लाभला आणि १९६१मध्ये भारत सरकारकडून पद्मश्री, १९६८मध्ये पद्मभूषण आणि १९८०मध्ये पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. मध्य प्रदेश शासनाकडून तानसेन पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला. रॉयल नेपाळ आर्ट अकॅडमीतर्फेही त्यांना सर्वोच्च मान लाभला. २००१मध्ये भारत सरकारने सनई वादनातील त्यांच्या अद्वितीय कामगिरीकरिता भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना गौरविले.

बिस्मिल्लाखाँ यांनी देश विदेशात अनेक ठिकाणी सनईवादनाचे कार्यक्रम केले. त्यांच्या सनईवादनाच्या ध्वनिमुद्रिका भारतात व परदेशांतही अत्यंत लोकप्रिय आहेत. गूंज उठी शहनाई या हिंदी चित्रपटातील त्यांचे सनईवादनही फार लोकप्रिय ठरले. स्वदेस या हिंदी चित्रपटासाठी देखील त्यांनी सनईवादन केलेले आहे. बिस्मिल्लाखाँ यांचा २१ ऑगस्ट २००६ रोजी वाराणसी येथे हृदयविकाराने मृत्यू झाला. (साभार : मराठी विश्वकोष)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मासिक पाळीच्या चक्राचे अडथळे असे करा दूर

मुली वयात आल्या की त्यांच्या शरीरात अनेक बदल होतात. असंतुलित हार्मोन्स, चिडचिडेपणा, तारुण्य, चेहऱ्यावर केस येणे आणि मासिक पाळी. मासिक पाळीचे हे चक्र प्रत्येक महिन्याच्या २८ दिवसानंतर येते. या पाच दिवसात महिल्यांच्या शरीरात अनेक शारीरिक आणि मानसिक बदल होताना दिसतात. कधीकधी धावपळीचं आयुष्य, कामाचा ताण, अपुरी झोप आणि बदलता आहार यामुळे या नैसर्गिक चक्रात अडथळे येतात. अशा वेळी आपण पटकन आराम मिळावा म्हणून औषधांकडे वळतो, पण कधीकधी आपल्या शरीराला गरज असते ती केवळ थोड्या विश्रांतीची आणि निसर्गाच्या सोबतीची. मासिक पाळी वेळेवर येण्यासाठी आपण कोणते उपाय करायला हवे पाहूया.




कच्ची पपई हा मासिक पाळी नियमित करण्यासाठी सर्वात जुना आणि प्रभावी उपाय आहे. पपईमध्ये कॅरेटीन असते. जे शरीरातील इस्ट्रोजेन हार्मोनला उत्तेजित करते. कच्च्या पपईच्या सेवनामुळे गर्भाशयाच्या स्नायूंना आकुंचन मिळण्यास मदत होते. ज्यामुळे थांबलेले पाळी वेळेत येते. पण अतिप्रमाणत कच्ची पपई खाल्ल्यास तोंड येणे किंवा घसा दुखू शकतो.

आल्यामध्ये दाहशामक गुणधर्म असतात आणि गूळ उष्ण आहे. आल्याचा छोटा तुकडा किसून तो पाण्यात उकळा आणि त्यात थोडा गूळ मिसळा. हे कोमट पाणी दिवसातून दोन वेळा प्यायल्याने शरीरातील उष्णता वाढते आणि रक्ताभिसरण सुधारते. यामुळे मासिक पाळी वेळेवर येते आणि पाळीदरम्यान होणाऱ्या क्रॅम्प्सपासूनही आराम मिळतो.

दालचिनी फक्त जेवणाची चव वाढवत नाही तर इन्सुलिनची पातळी नियंत्रित करण्यास आणि हार्मोन्स संतुलित होण्यास मदत होते. ज्या महिलांना झउजऊमुळे मासिक पाळीचा त्रास होतो, त्यांच्यासाठी दालचिनी रामबाण उपाय आहे. एक ग्लास कोमट दुधात अर्धा चमचा दालचिनी पावडर घालून रोज रात्री प्यायल्याने पाळीचे चक्र सुधारते आणि ती नियमितपणे येते.

तिळामध्ये लिग्नान नावाचे घटक असतात जे हार्मोन्स बांधून ठेवण्यास मदत करतात. ओवा पोटाच्या तक्रारी आणि वेदना कमी करण्यासाठी उत्तम आहे. एक चमचा तीळ आणि अर्धा चमचा ओवा पाण्यात उकळवून प्या. हे मासिक पाळी येण्याच्या १० दिवस आधीपासून केल्यास आपल्याला पाळी वेळेवर येते. तसेच त्रासही कमी होतो.

कोरफडीचा ताज गर काढून त्यात चमचाभर मध मिसळा. हे मिश्रण सकाळी रिकाम्या पोटी घेतल्याने मासिक पाळीशी संबंधित सर्व समस्या हळूहळू दूर होतात. कोरफड शरीरातील मेटॅबॉलिझम सुधारून प्रजनन आरोग्याला चालना देते.

# श्रीवर्धनमध्ये भटक्या श्वानांचा कहर; दोन दिवसांमध्ये सात जण जखमी

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धनमध्ये भटक्या श्वानांचा प्रश्न आता जीवघेणा बनला असून, नगरपरिषदेच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा तीव्र संताप व्यक्त होत आहे. अवघ्या दोन दिवसांत सात नागरिकांना श्वानांनी चावा घेतल्याच्या घटनांनी शहरात भीतीचं वातावरण पसरलं आहे.



नाका, मुख्य रस्ते आणि वर्दळीच्या भागांत श्वानांची टोळकी मोकाट फिरताना दिसत आहेत. एकट्याने जाणाऱ्या नागरिकांवर झडप घालून हल्ले करण्याच्या घटना वाढल्या असून, नागरिक अक्षरशः दहशतीत जीवन जगत आहेत.वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे नागरिक आक्रमक झाले आहेत. आज ७ जण जखमी झाले, उद्या जीवितहानी झाली तर जबाबदार कोण?नगरपरिषद झोपली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

काही महिन्यांपूर्वी जीवना बंदर आणि दांडा परिसरातही अशाच घटना घडल्या होत्या. त्यानंतरही प्रशासनाने कायमस्वरूपी उपाययोजना न केल्याने ही परिस्थिती पुन्हा उद्भवली आहे.पिसाळलेल्या श्वानांवर कारवाई करताना प्राणीप्रेमी संघटनांचा दबाव असल्याचं नागरिकांचं म्हणणं आहे. त्यामुळे नागरिक पुढाकार घेण्यास घाबरत असून परिस्थिती अधिकच बिकट होत आहे.नागरिकांनी भटक्या श्वानांवर नियंत्रणासाठी पकड मोहीम, निर्बीजीकरण आणि सुरक्षिततेचे उपाय तातडीने राबवण्याची मागणी केली आहे.

# लहान मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपीस अटक

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील एका पाच वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी आरोपीस त्वरित अटक करण्यात येऊन त्याच्यावर पोस्को अंतर्गत कारवाई करून त्याला अटक करण्यात आली आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की,एका ५२ वर्षीय इसमाने हे कृत्य केल्याने सर्वत्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.पीडित पाच वर्षीय मुलगी ही आपल्या घराच्या भोवती खेळत असताना संबंधित ५२ वर्षीय आरोपीने या मुलीस गोड बोलून आपल्या घरी नेले तिच्या सोबत अश्लील चाळे करून त्याच्या कडे असणाऱ्या मोबाईल मधील अश्लील फोटो सुद्धा दाखवले.सदरील प्रकारामुळे सदरची मुलगी घाबरून जाऊन तिच्या सोबत घडलेला सर्व प्रकार तिच्या आईस सांगितला.या मुलीच्या सर्व कुटुंब मुरुड पोलिस ठाण्यात पोहचून घडलेली सर्व हकीगत सांगितली.मुरुड पोलिसांनी सुद्धा वेळ न जाऊ देता तातडीने आरोपीस अटक केली सदरील प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश रसेडे करीत आहेत.

# माणगावात भाजप युवा मोर्चातर्फे अटल युवा रोजगार मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या पसारा २००५ कायद्याअंतर्गत सुरक्षा रक्षक भरती अभियान २०२६ करिता एस.एस.सेक्यूरिटी डिपार्टमेंट प्रा.लि.पुणे आणि भारतीय जनता पार्टी युवामोर्चा दक्षिण रायगडतर्फे माणगाव तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी अटल मेळाव्याचे आयोजन दि.२१ मार्च ते २५ मार्च २०२६ दरम्यान सकाळी ८ ते दु. २ वा. पर्यंत कृषी उत्पन्न बाजार समिती,माणगांव याठिकाणी करण्यात आले आहे.

सदर मेळाव्याचा लाभ तालुक्यातील जास्तीतजास्त तरुणांनी घ्यावा असे आवाहन भाजपचे दक्षिण रायगड युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे व तालुकाध्यक्ष परेश सांगळे,महिला मोर्चा तालुकाध्यक्षा रचना थोरे व सहकारी यांनी केले आहे.या मेळाव्यात तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. सुरक्षा रक्षक पदासाठी कायमस्वरूपी भरतीचे आयोजन करण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील व इतर मराठी तरुणांसाठी आय.एस.ओ. मानांकन प्राप्त कंपनीमध्ये कायमस्वरूपी पद नियुक्ती केली जाईल.

पसार २००५ कायद्याअंतर्गत सूक्ष्म लघु मंत्रालय नियमांतर्गत,बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये नियुक्ती केली जाणार आहे. या सुरक्षा रक्षक भरतीमध्ये एकूण ७२१ पदे भरावयाची आहेत. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना अंतर्गत भरती होणाऱ्या तरुणांना भरती झाल्यानंतर १६००० ते २४००० रुपये सुरवातीचा पगार,ओव्हरटाईम वेगळा पगार,वार्षिक पेमेंट वाढ व नियमाप्रमाणे भत्ते दिले जातील. शिवाय प्रोव्हिडंड फंड,संपूर्ण परिवारासाठी मेडिकल सुविधा,ग्रॅज्यूटी,पी.एफ पेन्शन,विधवा पेन्शन,अनाथ पेन्शन,ग्रुप इन्शुरन्स व नियमाप्रमाणे भत्ते मिळतील. वार्षिक बोनस,जवानांसाठी रूमची व्यवस्था अशा सुविधा असणार आहेत.

इच्छुक उमेदवारांनी आधारकार्ड, दहावी, बारावी किंवा पदवीधरपैकी एक शैक्षणिक प्रमाणपत्राची झेरॉक्स, पासपोर्ट साईज दोन फोटो, फॉर्म व रजिस्ट्रेशन फी रुपये ५०० (फक्त भरती होणाऱ्या तरुणांसाठी फॉर्म फी घेतली जाईल.) निवड झाल्यावर २१ दिवस ट्रेनिंग, युनिफॉर्म, ट्रेनिंग दरम्यान राहणे/खाणे याची सशुल्क व्यवस्था. ट्रेनिंग पूर्ण केल्यानंतर विविध नामांकित कंपन्यांमध्ये जॉइनिंग करण्यात येईल.

# 'स्वच्छ आणि सुंदर मुरूड बनविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे'

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड कोळी समाज आणि नगरपरिषद यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच मुरूड चे वैभव जपता येईल तरी आजच बदलाची सुरुवात करुया आणि स्वच्छ आणि सुंदर मुरुड बनुया त्याकरिता समाजाचे योगदान महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन मुरुड नगरपरिषद नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले. नगराध्यक्षा दालनात स्वच्छ आणि सुंदर मुरुड स्थानिक लोकसहभागातून बदल मच्छी मार्केट,मटण मार्केट आणि कोळीवाडा परिसरातील स्वच्छतेबाबत विशेष कृती आराखडा बैठकीच्या वेळी त्या बोलत होत्या.



मुरुड शहर स्वच्छ व सुंदर बनवण्यासाठी एक चित्रफीत बनवण्यात आली होती.ती यावेळी समस्त कोळी समाज प्रतिनिधींना दाखवण्यात आली.यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर,करनिरीक्षकअनिकेत जगदाळे, नगरसेविका प्रांजली मकु, अंकिता गुरव, सुगंधा मकु, नगरसेवक पाडुरंग आरेकर, आदेश दांडेकर, महादेव कोळी समाज नवापाडा अध्यक्ष कृष्णा बळी, शहर समन्वयक सचिन कोरके पाटील,अमोल रणदिवे,सुरेंद्र मकु, गणेश नाखवा, पांडुरंग गाणार,किसन बळी आदींसह कोळी समाजाचे महिला-पुरुष मंडळी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर म्हणाले की कोळीवाडा व समुद्रकिनाऱ्यांवर सांडपाणी आणि कचऱ्याचे ढीग तसेच मच्छी व मटण मार्केटच्या मागील अस्वच्छता पसरल्याने याठिकाणी दुर्गंधी पसरलेली असते.यामुळे याठिकाणी रोगराई निर्माण होईल व नागरिकांच्या आरोग्य ला धोका निर्माण होईल.आपल्या परिसरात नगरपरिषदे मार्फेत नियमित साफसफाई केली जाते. पण काही नागरिकांकडून पुन्हा प्लास्टिक व घनकचरा टाकला जातो.हे कुठे तरी थांबलं पाहिजे. जोपर्यत नागरिक कचरा टाकणे थांबवत नाहीत तो पर्यंत मुरूड स्वच्छ होणार नाही.

अस्वच्छतेमुळे या ठिकाणी संसर्गजन्य आजारांचा धोका वाढेल.त्याबरोबर सागरी पर्यावरणाचा -हास होईल जलचर प्राण्यांना धोका निर्माण होईल तसेच पर्यटन क्षेत्रावर परिणाम होऊन आर्थिक उत्पन्नाचा फटका आपल्याला बसेल.कोळीवाडा आणि मुरुडचे भविष्य एकच आहे कोळी समाजाची उपजीविका मच्छी मार्केट व कोळीवाडा हा स्थानिक अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे कोळीवाड्याची स्वच्छता ही केवळ एक नियम नाही तर मुरुड च्या आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे. स्वच्छ व सुरक्षित किनारे पर्यावरण पुरक आणि कचरामुक्त समुद्रकिनारा करुया. पर्यटनवृध्दीमुळे स्थानिक व्यवसायांना व कोळी समाजाला मोठी चालना मिळेल. तरी स्वच्छ मुरूड करिता नगरपरिषदेच्या स्वच्छता नियमांचे काटेकोर पालन करा. प्लास्टिकचा वापर थांबवावा. घरातला कचरा कचराकुंडीत ठेवा आणि येणाऱ्या नगरपरिषदेच्या घंटागाडीत सुखा व ओला कचरा वेगळा करुन टाका. जर कचरा रस्त्यावर टाकलात तर त्या व्यक्तीवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल.असा इशारा सुद्धा नगराध्यक्षा दांडेकर यांनी दिला आहे.नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी लवकरच कोळीवाडा समुद्रकिनारी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले जातील.असे आश्वाशित केले आहे.

# कमळ सेवा संस्था सुरू करणार अलिबागमध्ये कोड उपचार केंद्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरात कार्यरत असलेल्या कमळ सेवा संस्थेतर्फे अलिबाग शर्सतील म्हाडा कॉलनी, श्रीबाग येथे कोड या त्वचा रोगावरील उपचार केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

बुधवारी (दि.१८) कमळ सेवा संस्थे तर्फे कोड या असाध्य समजल्या जाणाऱ्या त्वचा रोगावर उपचार करणे बाबतची चर्चा करण्यासाठी सुप्रसिद्ध त्वचारोग तज्ञ श्रीमती माया तुळपुळे पुणे यांच्या उपस्थितीत एक चर्चासत्र पार पडले. या कार्यक्रमास अलिबाग शहरातील डॉक्टर देखील उपस्थित होते.श्रीमती माया तुळपुळे यांच्या श्वेता असोसिएट पुणे, संस्थे तर्फे संपूर्ण महाराष्ट्रात या त्वचा रोगा बद्दल प्रबोधन, मार्गदर्शन व उपचार केले जातात. त्याचाच भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन कमळ सेवा संस्थे द्वारे करण्यात आले होते. कोडावर उपचार करण्यासाठीचे आवश्यक ते प्रयत्न कमळ सेवा संस्था करणार करणार आहे.



कमळ सेवा संस्थेतर्फे लवकरच श्रीबाग येथील सतीश धारप डायलेसिस सेंटर येथे कोड उपचार केंद्र सुरू करण्यात येईल असे यावेळी जाहीर करण्यात आले.याप्रसंगी अलिबाग शहरातील सुप्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ डॉ. किरण नाबर, डॉ. अपूर्वा पाटील, डॉ. चंद्रकांत वाजे उपस्थित होते. विशेषतःकमळ सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेश प्रधान, कमळ पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके, कमळ पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांसह कमळ सेवा संस्थेचे ट्रस्टी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालक संस्थेचे उपाध्यक्ष प्रदीप नाईक यांनी केले.

# रोहा तालुका पोलीस निरीक्षकपदी सुयश कुमार सिंग

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्याला प्रभारी नव्या पोलीस निरीक्षकाच्या रूपाने तरुण व ऊर्जावान नेतृत्व मिळाले असून २०२४ बॅचचे आयपीएस अधिकारी सुयश कुमार सिंग यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. पदभार स्वीकारताच त्यांनी तात्काळ कामाचा धडाका सुरू करत ॲक्शन मोडमध्ये प्रवेश केला आहे. आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर, विशेषतः ईद निमित्त, रोहा शहरासह तालुक्यात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली.



नागरिकांनी सण आनंदात आणि शांततेत साजरा करावा, मात्र तो नियमांचे पालन करूनच साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले. रोहा तालुक्यात काम करण्याची संधी मिळणे हा माझ्यासाठी सन्मान आहे. नागरिकांनी कोणत्याही समस्येसाठी केव्हाही संपर्क साधावा, पोलीस प्रशासन त्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, तालुक्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर त्यांनी कठोर भूमिका घेतली असून बेकायदेशीर व समाजविघातक कृत्य करणाऱ्यांना स्पष्ट इशारा दिला आहे. अवैध व्यवसाय तात्काळ बंद करावेत, अन्यथा संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. नव्या पोलीस निरीक्षकांच्या या भूमिकेमुळे रोहा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होण्याची अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.


**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे. वाजापुर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

- मिळकतीचे वर्णन-

**मौजे : वाजापुर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| वाजापुर | १. बेबी त्रिंबक पाटील २.मिना गजानन फडके दोघीही रा. वाजे, ता-पनवेल, जि-रायगड ४१०२०६ | २१/अ/४/अ | ०.५०.९० ०.०४.५० ०.५५.०० | १४.१२ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/०३/२०२६**

सही/-
ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड
पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६ मो. क. ९६९९४९९९६३


# रमजान ईद मुबारक!

मुस्लिम धर्मीय बांधवांना रमजान या पवित्र महिन्यामध्ये रोजा(उपवास) करण्याचा आदेश दिला गेला आहे. या कालावधीमध्ये सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत अन्नग्रहण करण्यास सक्त मनाई केली गेली आहे. इस्लाम धर्म म्हणजे ईश्वरी इच्छेला शरण जाणे, अल्लाहच्या पुढे नतमस्तक होणे. म्हणजेच सजदा करणे होय.




इस्लाम धर्म हा संपूर्ण विश्वाला शांततेचा संदेश देतो. पवित्र रमजानच्या महिन्यात रोजा करून भूक व गरिबांच्या यातना काय असतात ते समजून घेणे होय.प्रत्येकांच्या प्रति प्रेमभाव आपुलकी आणि सदाचाराचा भाव या महिन्यात किंबहुना संपूर्ण हयातभर आपण अंगिकारली पाहिजे. इस्लाम धर्मामध्ये हज,जकात,नमाज,रोजा,कलमा या पाच गोष्टींना विशेष महत्व आहे.यातील प्रमुख गोष्ट म्हणजे रोजा होय. सर्व मुस्लिम धर्मीयांमध्ये या पवित्र रमजान महिन्यात रोजा करून अल्लाहाच सानिध्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात व ईश्वरपारायणता अंगिकारण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. रमजान महिना हा बरकतीचा महिना आहे. मनामनात भेदभाव, मत्सर, द्वेष, दरी कमी करून परस्परांमध्ये स्नेहभाव,सद्भाव वाढविणारा हा महिना आहे.हा पवित्र महिना संयम, त्याग, शांती, सहिष्णुता, चांगुलपणा,प्रामाणिकपणा,माणसांच्या ठायी रुजविणारा हा महिना आहे. हा महिना केवळ अल्लाहाची इबादत करावयाची व सर्व वाईट विचारांपासून कोसो दूर जायचे.या महिन्याचे पवित्र व माहात्म्य मुस्लिम धर्मीयांसाठी अनन्य साधारण असेच आहे.

कुणालाही आपल्यामुळे यातना होतील असे आचरण करायचे नाहीत. तन-मनाचं पवित्र जपणं आणि केवळ अल्लाहाच स्मरण करणं इबादत करणं हेच काम अग्रस्थानी असतं. याच पवित्र महिन्यात हजरत मुहम्मद पैगंबरांना त्यांच्या अखंड साधनेचे फळ प्राप्त झाले. अल्लाहाच्या साक्षात्काराचे मनोभावे दर्शन सर्वांनी मनापासून इबादत केल्यास नक्कीच होते.आपण लोककल्याणासाठी समस्त मानवतेसाठी याच महिन्यात अल्लाहाला मागणं करतो. इमाने इतबारे पवित्र कुराणातील संदेश सर्वांसाठी देतो. याच महिन्यात अल्लाहाच्या प्रसन्नतेची, विशालतेची साक्ष आपल्याला यथोचित होते. माणसाला त्याच्या भल्याबुऱ्यांची पापपुण्याची जाणीव करून देणाऱ्या या महिन्यात उपवास अर्थात रोजा करायचा असतो.रोजा म्हणजे आत्म्याचे आचार विचारणाचे शुद्धीकरण करणे होय. रमजान या पवित्र महिन्यातील रोजा म्हणजे सहरीपासून ते इफ्तारीपर्यंत निव्वळ अन्न-पाण्यापासून दूर राहून भुकेची यातना सहन करणे तेवढेच नव्हे तर आखून दिलेले नियम, बंधने, मर्यादा यांचे तंतोतंत पालन या महिन्यात करावयाचे असते. या महिन्यातील अल्लाहाच्या बंदाची इबादत अल्लाहाला अधिक प्रिय असते.या पवित्र महिन्यातील इबादतिया असर,नूर काही वेगळाच असतो. केवळ काहीही न खाणे म्हणजे रोजा नव्हे तर त्याचबरोबर ५ वेळची नमाज अदा करणे, अल्लाहाला आवडेल अशाच गोष्टी करणे, वाईट विचारांपासून स्वतःला दूर ठेवणे व सद्विचार व विवेकाने वागणे. अल्लाहाला ज्या गोष्टी प्रिय आहेत त्याच करणे. नम्र राहणे, अन्याय अत्याचारापासून स्वतः ला दूर ठेवणे.नीती मूल्यांची जपणूक करणे.डोळ्यात पवित्र भाव निर्माण करणे,सर्वांसाठी प्रेम मनात ठेवणे,चांगले सद्विचार ऐकणे,परोपकाराची भावना मनात जपणे,महिनाभराच्या या कठोर मनोनिग्रहानंतर ईदचा चाँद दिसला कि सर्व मुस्लिम बांधवांना मोठा आनंद होतो.ईद का चाँद ची मुबारक बात एकमेकांना देऊन दुसऱ्या दिवशी ईद साजरी केली जाते. सानथोर, गरीब-श्रीमंत असा भेद अल्लाहला मान्य नाही. अल्लाह सर्वांप्रती सारखेच आहेत. ईदच्या दिवशी ईदगाह काळ जाऊन नमाज अदा केली जाते. अल्लाहाचे आभार मानले जातात.एकमेकांना आलिंगन देऊन ईदमुबारक केली जाते.

**-सलीम शेख, माणगाव**


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-भातगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकती:-**

| अ.क्र | मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.-चौ मी | आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १) श्री. वामन धर्मा भगत, २) श्री. अनेश गणु ढवळे | ३८ | २/ब | ०-१४-२० | ०-१७ |
| २ | १) श्री. वामन धर्मा भगत, २) श्री. अनेश गणु ढवळे | ३८ | ३ | ०-०६-१० | ०-५८ |
| ३ | १) श्री. वामन धर्मा भगत, २) श्री. अनेश गणु ढवळे | ३८ | ४ | ०-०५-१० | ०-५२ |
| ४ | १) श्री. वामन धर्मा भगत, २) श्री. अनेश गणु ढवळे | ३८ | ५ | ०-०७-६० | ०-६९ |
| ५ | १) श्री. वामन धर्मा भगत, २) श्री. अनेश गणु ढवळे | ३८ | ८ | ०-०५-३० | ०-५० |
| या पैकी श्री. वामन धर्मा भगत यांचे अविभक्त सामाईक मालकीचे क्षेत्र | | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक :- २१/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
कार्यालयीन पत्ता : ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड.४१०२०१,
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल:-adv.jayeshmhase@gmail.com



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे. चाळ, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

- मिळकतीचे वर्णन-

**मौजे : चाळ, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटादारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| चाळ | श्रीपत जयराम पाटील पत्ता. रा. घोट, ता-पनवेल, जि-रायगड | ९७ | ०.६३.५० ०.०३.५० ०.६७.०० | ८.९४ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/०३/२०२६**

सही/-
ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड
पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ. सोसायटी, प्लॉट नं. १२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६ मो. क. ९६९९४९९९६३

# गॅस सिलिंडर, स्टोव्ह नसल्याने करंजा, मोरा बंदरात शेकडो मच्छीमार बोटींनी टाकला नांगर



**उरण : प्रतिनिधी**

आखाती युद्धामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांना आता व्यावसायिक गॅस सिलेंडरची झळ बसली आहे. गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे मच्छीमार स्टोच्या शोधात फिरु लागले आहेत, मात्र स्टोव्ह आहे तर बर्नल नाही. वाढत्या मागणीमुळे बाजारात तर दोन्ही मिळत नसल्याने पेचात सापडलेल्या मच्छीमारांवर मासेमारीसाठी जाणे अवघड होऊन बसले आहे. जेवण शिजवायलाच पर्याय उपलब्ध नसल्याने खोल समुद्रात मासेमारी जाणेही अवघड होऊन बसल्याने शेकडो मच्छीमार बोटींनी बंदरात नांगर टाकला आहे.

या अवघड परिस्थितीमुळे मात्र मच्छीमारांवर चिंतेचे सावट पसरले आहे. पुर्वीच्या मातीच्या चुली गेल्या, रॉकेलचे स्टो आले. स्टो गेले गॅस आले. आखाती युद्धामुळे आता व्यावसायिक गॅस सिलेंडर मिळेनासे झाले आहेत. त्यामुळे हॉटेल्स बंद पडली आहेत.आता पुन्हा चुल्ह्यावर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. शिमग्याचा सण साजरा करण्यासाठी आपापल्या गावी गेलेले हजारो मच्छीमार करंजा बंदरात माघारी परतले आहेत.शिमग्याची मजा लुटून माघारी परतलेल्या मच्छीमारांना मासेमारीचे वेध लागले आहेत. याआधी एका ट्रिपसाठी एकाच बोटीवरील १७ खलाशांचे जेवण बनविण्यासाठी १९ किलोचा एक गॅस सिलेंडर पुरेसा होता. आता मात्र युद्धामुळे मच्छीमारांना स्वयंपाक करण्यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडर मिळेनासे झाले आहेत. खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांसाठी चुलीवर स्वयंपाक शक्य नसल्याने फक्त स्टोचा एकमेव पर्याय मच्छीमारांकडे शिल्लक आहे. त्यामुळे उरण परिसरातील शेकडो मच्छीमार स्टोच्या शोधात फिरताना दिसु लागले आहेत.

मात्र वाढत्या मागणीमुळे बाजारात स्टोही मिळेनासे झाले आहेत, काही दुकानात स्टो आहे तर बर्नर नाही अशी अडचणीची स्थिती निर्माण झाली आहे. तीन दिवसांपासून उरणपासून तुर्भ्यांपर्यंतची बाजारपेठ पालथी घातली. काही दुकानात स्टो मिळाला मात्र बर्नर मिळाला नाही.अशी व्यथाच मच्छीमार दिलिप नाखवा यांनी मांडली.तर

या आधी व्यावसायिक १९ किलोचा गॅस सिलेंडर १८०० रुपयांमध्ये मिळत होता. आता मात्र तुटवड्यामुळे सिलेंडरसाठी चार हजारांवर किंमत मोजावी लागते आहे. तरीही सिलेंडर मिळत नसल्यामुळे अडचण निर्माण झाली असल्याचे मच्छीमार व्यावसायिक संजय पाटील यांनी सांगितले.

ज्यांची व्यावसायिक सिलेंडर, स्टोची व्यवस्था झाली अशा मच्छीमार बोटी खोल समुद्रात मासेमारीसाठी रवाना झालेल्या आहेत, मात्र ज्यांच्याकडे सिलेंडर, स्टोची व्यवस्था झाली नसल्याने करंजा, मोरा बंदरात सुमारे शेकडो मच्छीमार बोटी मासेमारीसाठी रवाना होऊ शकलेल्या नाहीत. युध्दामुळे हीच परिस्थिती पुढेही कायम राहिल्यास मासेमारी करुन परतणाऱ्या बोटींनाही स्वयंपाकासाठी इंधनाची उणीव भासणार आहे. त्यामुळे पुन्हा मासेमारी करण्यासाठी खोल समुद्रात रवाना होतील याची शाश्वती नाही, अशी माहिती मत्स्य व्यावसायिक रमेश नाखवा यांनी दिली.

# केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्यासोबत बंदर आणि सागरी क्षेत्रातील हितधारकांची आढावा बैठक

**उरण : बातमीदार**

केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्गमंत्री श्री. सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवार, दि. १९ मार्च रोजी बंदर व सागरी क्षेत्रातील हितधारकांसोबत आढावा व सल्लामसलत बैठक घेतली. जागतिक जहाज वाहतुकीच्या बदलत्या स्वरूपानुसार धोरणात्मक अनुकूलन साधण्यावर बैठकीत लक्ष केंद्रित करण्यात आले.

या बैठकीत शिपिंग कंपन्या, टर्मिनल ऑपरेटर आणि व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी एकत्र आले होते, जेणेकरून जहाजांचे मार्ग, जहाजांचे वेळापत्रक आणि मालवाहतुकीतील संभाव्य व्यत्ययांसारख्या उदयोन्मुख आव्हानांवर विचारविनिमय करता येईल. कामकाजातील सातत्य सुनिश्चित करणे, विलंब कमी करणे आणि पुरवठा साखळीची लवचिकता टिकवून ठेवणे यावर चर्चा केंद्रित होती.

आपल्या संबोधनात केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्गमंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले, मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारत सरकार तसेच बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग




मंत्रालयाने मध्यपूर्वेतील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या सागरी व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी तात्काळ व समन्वित पावले उचलली आहेत. वळवण्यात आलेल्या जहाजांचे पश्चिम किनाऱ्यावर कार्यक्षम हाताळणी, आंतरराष्ट्रीय जहाज कर्मचाऱ्यांना दिलेली मानवीय मदत, तसेच जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणासारख्या प्रमुख बंदरांवर राबविण्यात आलेल्या सक्रिय व्यापार सुलभीकरण उपाययोजनांद्वारे आपल्या बंदरांनी उद्भवणाऱ्या आव्हानांना समर्थपणे तोंड देण्याची क्षमता व लवचिकता प्रदर्शित केली आहे.

मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवरही भारताचा सागरी व्यापार स्थिर व लवचिक असल्याचा विश्वास भारताने जागतिक बाजारपेठेला दिला आहे. सक्षम पायाभूत सुविधा आणि समन्वित प्रयत्नांच्या बळावर देशातील बंदरे कार्यक्षमतेने कार्यरत असून, बदलत्या जागतिक अनिश्चिततेच्या काळात भारत एक विश्वासार्ह व्यापार भागीदार म्हणून स्वतःची भूमिका अधिक दृढ करत आहे. मध्यपूर्वेतील बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या व्यापारातील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर समन्वय व संवाद सुलभ करण्यासाठी जेएनपीए बंदराने सर्वप्रथम संयुक्त महासंचालक (डीजीएफटी), अतिरिक्त आयुक्त सीमाशुल्क, मुख्य महाव्यवस्थापक (वाहतूक) जेएनपीए आणि उप सागरी सल्लागार यांचा समावेश असलेली एक विशेष कार्यदल (टास्क फोर्स) स्थापन केली.

जेएनपीएने विविध सुलभीकरणात्मक उपाययोजना राबविल्या असून, त्यामध्ये मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या मालासाठी तात्पुरती ट्रान्सशिपमेंट साठवण सुविधा; आवश्यकतेनुसार टर्मिनल्समध्ये अतिरिक्त साठवण जागेचे वाटप; तसेच मध्यपूर्वेकडे जाणाऱ्या मालाच्या वहनासाठी तात्पुरत्या (अॅड-हॉक) जहाज कॉल्सची सोय करण्यात आली आहे. या अंतर्गत होर्मुझ सामुद्रधुनीच्या पूर्वेकडील फुजैराह आणि खोर फक्कन (यूएई) तसेच सोहार, मस्कत आणि सलालाह (ओमान) या बंदरांकडे माल वाहतुकीस प्राधान्य देण्यात आले आहे. याशिवाय, नाशवंत माल आणि मध्यपूर्वेतून परतणाऱ्या निर्यात मालाच्या जलद हाताळणीसही प्राधान्य देण्यात आले आहे.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाकडे सध्या पुरेशी साठवण क्षमता उपलब्ध असून, बंदरातील कंटेनर साठवण जागेपैकी केवळ सुमारे ५०% क्षमतेचा वापर सध्या होत आहे.

# वाशीमध्ये जागतिक चिमणी दिवस उत्साहात साजरा; चिऊताईच्या संरक्षणासाठी सुज्ज्ञ नागरिकांचा पुढाकार

**नवी मुंबई : बातमीदार , प्रतिनिधी**

दिव्या वैभव गायकवाड फाउंडेशनच्या वतीने वाशी येथील सेक्टर १ ते ६ ट्री बेल्ट परिसरात जागतिक चिमणी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शहरी भागातून झपाट्याने कमी होत चाललेल्या चिमण्यांच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा होता.

कार्यक्रमादरम्यान चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी, पाणी पिण्याची भांडी तसेच दाणे ठेवण्यासाठी भांडी लावण्यात आली. यामुळे उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पक्ष्यांना सुरक्षित व अनुकूल वातावरण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनासाठी आपली बांधिलकी दर्शवली.

काँक्रीटच्या इमारतींमुळे घरटी



बांधण्यास जागा नाही,मोबाईल टॉवर्समधील किरणोत्सर्ग,अन्नसाखळीचा अभाव ,कीटकनाशकांचा अति वापर,पाण्याची टंचाई गेल्या यामुळे दोन दशकांत भारतातील शहरांमध्ये चिमण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली असून एकेकाळी सहज दिसणारी चिमणी आज दुर्मिळ होत चालली आहे. काही तज्ञांच्या मते शहरी भागात चिमण्यांची संख्या ५०% पेक्षा अधिक कमी झाली आहे

चिमणी ही केवळ एक पक्षी नसून पर्यावरणीय समतोल ठेवण्यातील एक महत्वाचा घटक आहे. कारण कीटक नियंत्रणात राहिल्याने शेतीला त्याचा फायदा होतो,तसेच जैवविविधतेचे संतुलन राखले जाते.

जर ही स्थिती अशीच राहिली तर शहरांमधून चिमण्या पूर्णपणे नामशेष होण्याचा धोका असून , नैसर्गिक कीटक नियंत्रण कमी होऊन पर्यावरणीय समस्या वाढू शकतात, पुढील पिढीला चिमणी केवळ पुस्तकातच पाहायला मिळण्याची शक्यता आहे त्यासाठी नागरिकांनी घराच्या गच्चीवर/बाल्कनीत कृत्रिम घरटी लावणे, उन्हाळ्यात त्यांच्यासाठी पाण्याची भांडी ठेवणे ,धान्य/दाणे नियमित ठेवणे,झाडे लावून नैसर्गिक अधिवास तयार करणे, रासायनिक कीटकनाशकांचा कमी वापर करावा असे आवाहन या उपक्रमातून नगरसेविका दिव्या गायकवाड आणि उपस्थित इतर मान्यवरांनी केले आहे. उपस्थितांनीही प्रत्येकाने आपल्या घराजवळ चिमणीसाठी जागा तयार करावी असा संकल्प व्यक्त केला. दिव्या वैभव गायकवाड फाउंडेशनचा हा उपक्रम केवळ एक दिवसापुरता मर्यादित नसून पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी दिली.

# लोककवी रामनाथ म्हात्रे यांना वासंती ठाकूर स्मृती आगरी लोकसंस्कृती पुरस्कार प्रदान

**नवी मुंबई : बातमीदार**

उरण तालुक्यातील चिर्ले येथे काव्य दरबारच्या वतीने रविवार ( ता. १५ ) रोजी पोपटी काव्य संमेलन मोठ्या उत्साहात आणि साहित्यिक वातावरणात पार पडले. या संमेलनात विविध कवी, साहित्यिक व काव्यरसिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. काव्यवाचन, साहित्यिक संवाद आणि मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

यावेळी, साहित्यप्रेमी आणि काव्यरसिकांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाने परिसरात साहित्यिक वातावरण निर्माण केले. या काव्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी



कविवर्य संदेश भोईर उपस्थित होते. त्यांच्या अनेक जुन्यागोड आठवणीनी कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. कार्यक्रमादरम्यान समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला साहित्यिक चंद्रकांत पाटील, चंद्रकांत मढवी, म. वा. म्हात्रे, देवांगना मुंबईकर, सुरेश भोपी, गजानन म्हात्रे आणि मान्यवर उपस्थित होते. तर, काशीनाथ मढवी, मीनल माळी, हरिश्चंद्र माळी, अरुण म्हात्रे, भ. पो. म्हात्रे आणि रेश्मा ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजन आणि सहकार्यामुळे हा साहित्यिक सोहळा यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# दिवाळे कोळीवाड्यात रंगणार आगरी-कोळी संस्कृतीचा सोहळा



**नवी मुंबई : बातमीदार**

आधुनिकतेच्या वेगवान लाटेत आपल्या मुळांपासून दूर जात असलेल्या नव्या पिढीला पुन्हा आपल्या संस्कृतीशी जोडण्यासाठी दिवाळे कोळीवाड्यात आगरी-कोळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २० ते २२ मार्चदरम्यान तीन दिवस चालणारा हा महोत्सव केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नसून, परंपरा, ओळख आणि अभिमान जपण्याचा एक अर्थपूर्ण प्रयत्न आहे.

या महोत्सवात समुद्राशी घट्ट नाळ जोडलेल्या कोळी समाजाचे जीवन, त्यांचे कष्टमय दैनंदिन वास्तव, पारंपरिक गीते, कोळी नृत्ये आणि समृद्ध खाद्यसंस्कृती यांचे जिवंत दर्शन घडणार आहे. शहराच्या गजबजाटात हरवणाऱ्या चालीरीती पुन्हा अनुभवण्याची आणि त्या नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची ही एक अनोखी संधी ठरणार आहे.

विशेष म्हणजे तीन दिवसांच्या या सोहळ्यात लहान मुलांची पारंपरिक नृत्ये तसेच राजेश खर्डे यांच्या वेसावकर मंडळींकडून सादर होणारे संस्कृतीदर्शन आणि जगदीश पाटील यांच्या 'कोळी नाखवा दर्याचा राजा' या विशेष कार्यक्रमाने प्रेक्षकांच्या आनंदाला उधाण येणार आहे. प्रत्येक सादरीकरणातून आपण कोण आहोत याची जाणीव नव्याने जागवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

हा महोत्सव केवळ पाहण्यापुरता मर्यादित नसून अनुभवण्याचा आणि जगण्याचा आहे. आपली संस्कृती जिवंत राहिली पाहिजे आणि ती पुढील पिढीपर्यंत पोहोचली पाहिजे, या भावनेतून नवी मुंबईसह इतर शहरांतील कोळी-आगरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या परंपरेचा अभिमान साजरा करावा,असे सांगितले

# सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**नवीन पनवेल :** बंगल्याची लोखंडी जाळी उचकटून आत मध्ये प्रवेश करून चोरांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात १७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सुरेंद्रकुमार अशोक सिंग हे सेक्टर १२, नवीन पनवेल येथे राहत असून ते त्यांच्या गावी गेले होते. १६ मार्च रोजी गावाहून परत आले असता चोरांनी बंगल्याच्या बाथरूमच्या खिडकीची लोखंडी जाळी उचकटून आत प्रवेश केला आणि एक लाख ९६ हजार रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.याबाब्त खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे

# युईएस लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूलमध्ये गुढीपाडवा सण साजरा

**उरण : प्रतिनिधी**

भारतीय परंपरे नुसार मराठी नववर्षाची सुरुवात गुढीपाडवा ह्या शुभदिवसापासून होते, हिच परंपरा जपताना, गुरुवार दिनांक १९ मार्च २०२६ रोजी यु. ई. एस. लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूल मध्ये गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला.

यु. ई. एस. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनी दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर सरस्वती मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ गुढी उभारुन पुजा केली. त्यावेळी त्यांच्यासोबत संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, खजिनदार ॲड.अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मिनाक्षी गुप्ता, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व



पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, पीटीएचे उपाध्यक्ष तसेच शिक्षक गण, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला एका शिक्षिकेने गुढीपाडव्याचे महत्व सांगितले. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांनी सर्व उपस्थितांना पाडव्याच्या आणि नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सिनिअर के. जी. च्या विद्यार्थ्यांनी गाण्याच्या माध्यमातून सर्व उपस्थितांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर संगीत शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता ६ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वंदना म्हटली.

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही गुढीपाडव्याच्या दिवशी नव्याने प्रवेश घेतलेल्या पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांकडून पाटीवर सरस्वीतचं चित्र काढायला लावून त्यावर फुले व हळद कुंकू वाहून पाटीपूजन करायला सांगण्यात आले. रांगोळी, सजावट व सर्व उपस्थितांचे स्वागत, कार्यक्रमाचं सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकांनी केलं. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे विद्यार्थी व पालकांना मिठाई तसेच नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन अभ्याक्रम असलेला एनईपी पुस्तकांचा संच व स्कूल बॅग देण्यात आली. अशा रितीने यु. ई. एस. लिटिल सिड्स इंटरनॅशनल प्री-स्कूल मध्ये गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला.

# घणसोली येथे बेघर निवारा केंद्रात माणुसकीची गुढी

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली येथील नवी मुंबई महानगरपालिका बेघर निवारा केंद्र/रात्र निवारा केंद्र येथे हिंदू नववर्ष व गुढीपाडवा सण अत्यंत उत्साहात, आनंदी व मंगलमय वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी पारंपरिक पद्धतीने माणुसकीची गुढी उभारण्यात आली. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, आपुलकी आणि एकात्मतेचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान केंद्रातील ३२ पुरुष, ५९ महिला आणि २ बालके यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत गुढी पूजन केले. सर्वांनी एकत्र येत सण साजरा केल्याने एक कुटुंब असल्याची भावना निर्माण झाली. बेघर असलेल्या नागरिकांच्या जीवनात आनंदाचे, सन्मानाचे आणि आत्मीयतेचे क्षण निर्माण करण्याचा हा उपक्रम ठरला.

समाजसेवक निलेश सोमाजी कचरे यांच्या पुढाकारातून या सणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी सर्व रहिवाशांसाठी



पारंपरिक पुरणपोळीच्या जेवणाची विशेष व्यवस्था केली होती. सणाच्या निमित्ताने केंद्रात आनंद, उत्साह आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमास सुप्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शिंदे, अभिनेत्री बबिता भट्ट तसेच माजी शास्त्रज्ञ विजयलक्ष्मी रविशंकर यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांनी स्वतः गुढी उभारून केंद्रातील रहिवाशांशी संवाद साधत त्यांच्यासोबत सण साजरा केला. त्यांच्या उपस्थितीमुळे रहिवाशांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

उल्लेखनीय म्हणजे, हे निवारा केंद्र २०२४ च्या गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरू झाले असून, यंदा सलग तिसऱ्या वर्षी येथे गुढी उभारून सण साजरा करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिकेचा हा प्रकल्प बेघर, निराधार व गरजू नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायी ठरत असून त्यांना सुरक्षित निवारा, अन्न व सन्मानाचे जीवन देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

यावेळी समाजसेवक निलेश कचरे म्हणाले की, ज्यांचे या जगात कोणी नाही, ज्यांची अवस्था रस्त्यावर व फुटपाथवर अत्यंत दयनीय होती, अशा सर्वांना एक छताखाली सुरक्षित आसरा देत त्यांना आपुलकीचे घर देणे हेच खरे समाजकार्य आहे. माणुसकीची गुढी उभारून आपण नववर्षाची खरी सुरुवात करत आहोत.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निवारा व्यवस्थापक राहुल वाढे, काळजीवाहक (नर्स) वैशाली डोंगरे, सुरक्षा रक्षक मनोज म्हात्रे व चंद्रकांत पाटील यांनी विशेष सहकार्य केले. तसेच सानपाडा येथील रहिवासी तुषार बोंबे व मंगेश कदम यांनीही या उपक्रमात सहभाग नोंदवला.हा उपक्रम केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, समाजातील दुर्बल घटकांना आधार देणारा, त्यांना सन्मानाने जगण्याची नवी दिशा देणारा आणि माणुसकी जपणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे.

# स्मार्ट व्हिलेज दिवाळेत जीवघेण्या वीजवाहिन्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**

स्मार्ट व्हिलेज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाड्यातील डॉक्टर गल्ली आणि परिसरात वीजवाहिन्यांचा अक्षरशः 'जंजाळ' निर्माण झाला असून, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित ठिकाणी विद्युत खांबाभोवती



असंख्य तारा अनियमितपणे गुंडाळलेल्या अवस्थेत दिसत असून, ही परिस्थिती अत्यंत धोकादायक असल्याचे स्पष्टपणे दिसतं असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

यावेळी, सभोवताळच्या वीज खांबावर आणि त्याच्या आसपास घराणसह विविध प्रकारच्या वायर कोणत्याही नियोजनाशिवाय एकमेकांत गुंतलेल्या असून, काही वायर खाली लोंबत आहेत तर, काही उघड्या अवस्थेत असल्याने कोणत्याही क्षणी शॉर्टसर्किट होण्याची दाट शक्यता आहे. तसेच खांबाजवळच इतर उपकरणे उघड्यावर असल्याने आग लागण्याचा धोका अधिक आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या परिसरात यापूर्वीही शॉक लागण्याच्या तसेच किरकोळ आगीच्या घटना घडल्या आहेत. मात्र, सुदैवाने मोठी दुर्घटना टळली आहे. तरीदेखील महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. विशेष म्हणजे, हा परिसर दाट वस्तीचा असून लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत या उघड्या आणि गुंतागुंतीच्या वायर कोणत्याही क्षणी जीवघेण्या ठरू शकतात.

दरम्यान, पावसाळ्यात ही समस्या अधिकच गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात असून, नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. मोठी दुर्घटना झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल स्थानिकांनी उपस्थित केला जात आहे...!

# प्रत्येक तालुक्यात मिनी सरस प्रदर्शन भरवणार -ना. आदिती तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ मोठ्या शहारांमध्ये सरस प्रदर्शन आयोजित केले जाते. रायगड जिल्ह्याने अलिबाग या मुख्यालयाच्या शहरात जिल्हास्तरीय सरस आयोजित केले आहे. महिलांनी तयार केलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्रीसाठी अशाप्रकारचे मिनी सरस प्रत्येक तालुक्यात आयोजित केले जातील. येत्या आर्थिक वर्षात राज्यात २५ लाख महिलांना लखपती दिदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, अशी माहिती राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत महिला स्वयंसहाय्यता समूहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे मिनी सरस प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून अलिबाग येथे करण्यात आले आहे. याचे उद्घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २०) करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, रायगड उपाध्यक्ष मधुकर पाटील, भाजपचे गटनेते वैकुंठ पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते संतोष बैलमारे, प्रतोद अमित नाईक, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, अभिषेक विचारे, जनार्दन भस्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक तथा अतिरिक्त कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या लखपती दिदी योजने अंतर्गत महिलांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न एक लाखांपेक्षा जास्त होण्यासाठी प्रयत्न केले जातात. मागील आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील ३७ लाख महिला लखपती झाल्या आहेत. यंदाच्या आर्थिक वर्षात या योजनेतून राज्यातील आणखी २५ लाख महिलांना लखपती दिदी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे मंत्री आदिती तटकरे यांनी यावेळी सांगितले.

महिलांना सहकार्य करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्यांच्या पाठिशी भक्कमपणे उभे राहणार आहोत. रायगड जिल्हा परिषदेच्या यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये महिला सक्षमीकरणासाठी भरीव तरतूद करण्यात येईल, असे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जाहीर केले.

रायगड जिल्हातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू दर्जेदार असतात, परंतु त्यांचे पॅकिंग व्यवस्थित नसते. हे पॅकिंग चांगले करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद मदत करेल, असे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी प्रास्ताविक केले. संदीप ठोंबरे यांनी सूत्रसंचालन केले, तर अतिरिक्त कार्यकारी अधिकारी प्रियदर्शनी मोरे यांनी आभार मानले.

अलिबाग येथील मिनी सरस २४ मार्चपर्यंत आहे. या प्रदर्शन व विक्री महोत्सवात एकूण १०२ स्टॉल असणार आहेत. सुमारे ८६ बचत गटांनी सहभाग घेतला आहे. यामध्ये ६९ स्टॉल हे विविध प्रकारच्या वस्तू, १३ स्टॉल खाद्यपदार्थ, शासकीय विभागांत कृषी विभागाचे स्टॉल, जिल्हा उद्योग केंद्राचे २ स्टॉल, महिला आर्थिक विकास महामंडळाचे ४ स्टॉल, महिला बालकल्याण विभागाचा १ व शिक्षण विभागाचा १ असे स्टॉल उभारण्यात आले आहेत.

# भाजप युवा मोर्चा माणगाव तालुका अध्यक्षपदी योगेश खडतर यांची नियुक्ती



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील उमरोली गावचे युवा उद्योजक योगेश काशीराम खडतर यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली.

यावेळी युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, जिल्हा सरचिटणीस हेमा मानकर, भाजप तालुकाध्यक्ष परेश सांगले, जेष्ठ नेते संजयआप्पा ढवळे, किसान मोर्चा जिल्हा चिटणीस अनंत लाड, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रुपाली कासारे, महिला तालुकाध्यक्ष रचना थोरे, तालुका सरचिटणीस किसन महाडिक, बाबुराव चव्हाण, उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, अनिल दांडेकर, माजी तालुकाध्यक्ष उमेश साटम व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना निलेश थोरे यांनी सांगितले कि कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेला परंतु विचारधारेमध्ये सतत कार्यरत असणारा कुणबी समाजाचा युवा चेहरा म्हणून योगेश खडतर यांच्याकडे पहिले जाते.तरुणांची व विद्यार्थ्यांचे दाखले,प्रमाणपत्रे इतर कागदोपत्री ज्ञान असणारा व प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये सुपरिचित असणारे योगेश खडतर यांच्यामुळे युवामोर्चाला भविष्यात चांगली बांधणी करता येईल त्यामुळेच त्यांना जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशीलदादा पाटील,सरचिटणीस सतीश धारप,श्रीवर्धन विधानसभा प्रमुख प्रशांत शिंदे,तालुकाध्यक्ष परेश सांगले यांच्या मार्गदर्शनाखाली ही अत्यंत महत्वाची जबाबदारी दिलेली असून भविष्यात ते पक्षाला अधिक बळकट करतील हा विश्वास आहे.

यावेळी योगेश खडतर यांनी सांगितले कि पक्षात आल्यानंतर प्रथमच एवढी मोठी जबाबदारी देऊन वरिष्ठ नेतृत्वाने माझा सन्मान केला आहे व या संधीचे सोने करून भविष्यात माणगांव तालुका युवा मोर्चा अधिक मजबूत करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करेन.

# लोणेरे गावातील वीज समस्या लागली मार्गी

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव तालुक्यातील लोणेरे गावामध्ये अनेक वर्षपासून थ्री फेज लाईन नसल्यामुळे ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत होता. कमी व्होल्टेजमुळे फॅन, लाईट, एसी, फ्रिज यांसारखी विद्युत उपकरणे व्यवस्थित चालत नव्हती. त्यामुळे लहान मुले, विद्यार्थी तसेच वयोवृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.



या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसैनिकांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (एम.एस.सी.बी) गोरेगाव विभाग कार्यालयात जाऊन कार्यकारी अभियंता आर. जे. पाटील तसेच उपकार्यकारी अभियंता राठोड यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या वेळी लोणेरे गावातील वीज समस्येची सविस्तर माहिती देण्यात आली व तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

शिवसैनिकांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत एम.एस.सी.बी गोरेगाव विभागाने तात्काळ कार्यवाही करत आवश्यक काम पूर्ण केले. या कामास आर. जे. पाटी, राठोड तसेच लाईनमन केशव जाबरे, वायरमन सोमेश्वर कालसरपे,भावेश धोडगे, अनिकेत कोदे विषेश मेहनत घेतली.त्यामुळे लोणेरे गावातील वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागला असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.या समस्येसाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे अखेर प्रयत्नांना यश आले. विधानसभा समन्वयक निलेश केसरकर, युवासेना उपतालुका प्रमुख अभिजित टेंबे, युवा नेते सयजू टेंबे, अविनाश टेंबे, सचिन उतेकर आणि भूषण टेंबे यांनी या कामासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे लोणेरे गावातील वीज समस्या दूर झाल्याने ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आढळला मानवी सांगाडा; माहिती देण्याचे पोलिसांकडून आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर खालापूर हद्दीत मानवी सांगाडा आढळला असून आपल्या कुणा घरातील, नातेवाईक, मित्र परिवार यांच्यातील सदस्य गायब असल्यास त्वरीत खालापूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आवाहन खालापूर सहायक पोलीस निरीक्षक मनीष मोरे यांनी केले आहे.

दरम्यान, मानवी सांगाडा सापडल्यावर खळबळ माजली असून, साधारण तीन महिन्यांपूर्वी मृत्यू झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर धामणी गावाच्या हद्दीत पुणे लेननजीक मानवी सांगाडा असल्याची माहिती आय.आर.बी. चे कर्मचारी संतोष गजानन मोरे राहणार माउंटन,५० खोपोली याने खालापूर पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलिस निरीक्षक सचिन पवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक मनीष मोरे यांनी घटनास्थळी भेट दिली. केवळ सांगाडाच उरला असून, सांगाडा पुरुष की स्त्रीचा ओळखणे देखील कठीण झाले होते. याबाबत पंचनामा करण्यात आला असून, मृत्यू अज्ञात कारणाने झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या मानवी सांगाडा जवळ आई एकवीरा या नावांची लाल व पिवळ्या रंगाची मंकी टोपी,एक स्टीलची प्लेट (हाड जुळवण्यासाठी वैदयकीय अधिकारी यांनी लावलेली )एक काळ्या रंगाचा जुना जळालेला रेनकोट, एक पांढरा मळकट रंगाचा जळालेला शर्ट, एक मानवी कवटी व खालील जबडा, हाता पायाचे हाडे आहेत. तरी यांतील अनोळखी मयत ईसम यांचा व मयताचे नातेवाईक यांचा आपल्या पोलीस स्टेशनच्या हददीत शोध घेवून माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तपासी अधिकारी एम. के. मोरे, सहा. पोलीस निरीक्षक खालापूर पोलीस ठाणे मोबा. क. ७०४५०२७१८१. अथवा खालापूर पोलीस ठाण्यात द्यावी.

# उन्हाळी सुट्टीत कोकणवासीयांसाठी विशेष रेल्वेसेवा

**रोहा : प्रतिनिधी**

कोकणवाशीयांसाठी मध्य रेल्वेने प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मडगाव व लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाड्यां सोडणार आहेत.यासह मध्य रेल्वे प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक रोड आणि नागपूर येथून विविध गंतव्यस्थानांसाठी '२०१२ उन्हाळी विशेष गाड्या' चालवणार आहे.याव्यतिरिक्त, आणखी १२० विशेष गाड्या मागणीनुसार (ढजऊ) चालवण्याचे देखील नियोजन करण्यात आले आहे.

मध्य रेल्वे कडुन सोडण्यात येणाऱ्या विशेष गाड्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस साप्ताहिक विशेष गाड्यां ट्रेन क्रमांक ०११७१ ही साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १६.०४.२०२६ ते ११.०६.२०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून दर गुरुवारी ००.२० वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी १५.१५ वाजता पोहोचेल. (९ सेवा) ट्रेन क्रमांक ०११७२ ही साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १६.०४.२०२६ ते ११.०६.२०२६ या कालावधीत मडगाव येथून दर गुरुवारी १६.०० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०३.४५ वाजता पोहोचेल. (नऊ सेवा)

या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत.

मडगाव -लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाड्यां ट्रेन क्रमांक ०१११९ ही साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १७.०४.२०२६ ते १२.०६.२०२६ या कालावधीत, लोकमान्य टिळक टर्मिनस येथून दर शुक्रवारी ००.५५ वाजता सुटेल आणि मडगाव येथे त्याच दिवशी १५.१५ वाजता पोहोचेल. (९ सेवा)ट्रेन क्रमांक ०११२० ही साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १७.०४.२०२६ ते १२.०६.२०२६ या कालावधीत, मडगाव येथून दर शुक्रवारी १६.०० वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०३.३० वाजता पोहोचेल. (९ सेवा)

या गाडीला ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी, थिविम आणि करमाळी हे थांबे देण्यात आले आहेत.

# आईबाबा फाऊंडेशन व्यसनमुक्ती केंद्रात सामुदायिक अग्निहोत्र कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

आईबाबा फाऊंडेशन चौक येथे सामुदायिक अग्निहोत्र कार्यक्रम अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि आध्यात्मिक वातावरणात संपन्न झाला.

व्यसनमुक्ती केंद्रात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. नुकतेच गुरुमंदीर श्री स्वामी समर्थ संस्थापित बाळाप्पा महाराजांचा मठ, अक्कलकोट, विश्व फाऊंडेशन शिवपुरी अक्कलकोट यांच्या मार्गदर्शनाखाली १०८ सामुदायिक अग्निहोत्र कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संपूर्ण परिसर मंत्रोच्चारांनी आणि पवित्र ऊर्जेने भारावून गेला. श्री स्वामी समर्थ भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक उपक्रमात सहभागी झाले. या प्रसंगी उपस्थितांनी अग्निहोत्राच्या माध्यमातून पर्यावरण शुद्धीकरण, मानसिक शांती आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याचा संदेश समाजाला दिला.

अग्निहोत्र ही भारतीय वैदिक परंपरेतील एक साधना मानली जाते. यामुळे वातावरणातील प्रदूषण कमी होण्यास, आरोग्यदायी वातावरण निर्माण होण्यास आणि मन:शांती मिळण्यास मदत होते. अशा सामुदायिक उपक्रमांमुळे समाजात आध्यात्मिक जागृती, एकात्मता आणि संस्कृतीची जपणूक अधिक बळकट होते, असे आईबाबा फाऊंडेशनचे संचालक प्रवीण नवरे यांनी सांगितले.



# नानक साई फाऊंडेशनतर्फे रामनवमीला साईभक्त संमेलन

**पाली : प्रतिनिधी**

रामनवमीच्या पावन पार्श्वभूमीवर नानक साई फाऊंडेशनतर्फे शिर्डी येथे २५ मार्च रोजी भव्य साईभक्त संमेलन आयोजित करण्यात आले असून या संमेलनाची जय्यत तयारी सुरू आहे.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी, श्री संत कवी दासगणू महाराज साई भक्त मंडळ उमरी (गोरठे), साईं मानव सेवा ट्रस्ट, साईं धाम ट्रस्ट यांच्या सहकार्याने हे भव्य संमेलन पार पडणार आहे. हे संमेलन सर्व साई भक्तांसाठी खुले असून देशभरातील साई भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख पंढरीनाथ बोकारे यांनी केले आहे. या संमेलनास रायगडातून हजारो साईभक्त सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

याबरोबरच या संमेलनासाठी मुंबई, महाराष्ट्र, झारखंड, दिल्ली, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश या राज्यांतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर हे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या विशाल साई भक्त संमेलनात भजन, पालखी मिरवणूक तसेच साई विचारांची देवाणघेवाण असे विविध भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. साईबाबांच्या श्रद्धा आणि सबुरी या संदेशाचा प्रसार करण्यासाठी अशा प्रकारच्या संमेलनांचे मोठे महत्त्व असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले. २५ मार्च रोजी च्या या कार्यक्रमात सहभागी होऊन साईबाबांचे आशीर्वाद प्राप्त करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्राव्य कीर्तनातून घडले समाजप्रबोधन

**पाली : प्रतिनिधी**

श्री क्षेत्र बेणसे येथे इंद्रे -पाटील परिवारातर्फे श्री कुलदैवत चलप्राणप्रतिष्ठा व महाभिषेक सोहळ्याचे शानदार आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त विलास रमाकांत इन्द्रे यांच्या निवासस्थानी सलग दोन दिवस विविध धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी कृष्णाई महिला मंडळ हेटवणे यांचा हरिपाठ कार्यक्रम तर मरीआई भजन मंडळ अटीवली व लक्ष्मीनारायण भजन मंडळ मुंढाणी यांचा भजन कार्यक्रम पार पडला. समारोप कार्यक्रमात पाटनोली पनवेल येथील भागवताचार्य समाजप्रबोधनकार ह.भ.प महेश महाराज साळुंके यांचे सुश्राव्य कीर्तन व प्रभावी प्रबोधन कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास इंद्रे पाटील परिवार व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृत्रिम अवयवांमुळे दिव्यांगांना स्वावलंबनाची शक्ती!

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथे भारत विकास परिषद संचलित दिव्यांग पुनर्वसन केंद्र, पुणे ट्रस्ट-नव भारत विकास फाऊंडेशन यांच्या वतीने मोफत दिव्यांग शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात कृत्रिम मॉड्युलर पाय, हात तसेच कॅलिपर बसविण्यासाठी दिव्यांग बांधवांची वैद्यकीय तपासणी करून अचूक मोजमाप घेण्यात आले.



या शिबिराचा एकूण १०३ दिव्यांग लाभार्थ्यांनी लाभ घेतला असून पुढील टप्प्यात पात्र लाभार्थ्यांना आधुनिक कृत्रिम पाय व हात मोफत बसविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. या सामाजिक उपक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ पुणे, भारत विकास परिषद तसेच माणगाव तालुक्यातील स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात आले होते. या प्रकल्पासाठी रोटरी क्लब ऑफ पुणेचे प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर आर्या पवार यांनी मार्गदर्शन केले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी दिव्यांग व वृद्धत्व केंद्राचे प्रमुख विनय खुटवळकर (पुणे) यांनी उपस्थित दिव्यांग बांधवांना आधुनिक कृत्रिम अवयवांच्या तंत्रज्ञानाबाबत सविस्तर माहिती दिली. या अत्याधुनिक साधनांमुळे दिव्यांग व्यक्तींना चालणे - फिरणे, दैनंदिन कामे करणे आणि स्वावलंबी जीवन जगणे अधिक सुलभ होत असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील तसेच जिल्ह्या बाहेरून आलेल्या सुमारे १०३ दिव्यांग बांधवांच्या जीवनात नवी उमेद निर्माण झाली असून त्यांना हक्काची गती आणि शक्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दिव्यांगांच्या जीवनात आत्मनिर्भरता व आत्मविश्वास निर्माण करणारा हा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# हैदराबाद संघाला आणखी एक धक्का!

## स्टार खेळाडू जॅक एडवर्ड्स आयपीएलमधून बाहेर

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धेची सुरुवात येत्या २८ मार्चपासून होणार आहे. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. या सामन्याआधी हैदराबाद संघाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. संघातील स्टार अष्टपैलू खेळाडू जॅक एडवर्ड्स दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला आहे.



आयपीएलला सुरुवात होण्याआधी सनरायझर्स हैदराबाद संघाचे टेन्शन वाढले आहे. संघाचा कर्णधार पॅट कमिन्स अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे त्याच्या जागी स्फोटक फलंदाज इशान किशनची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. स्पर्धा सुरू होण्याआधी अवघे काही दिवस शिल्लक असताना जॅक एडवर्ड्स हा ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडूही स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

माध्यमातील वृत्तानुसार शेफिल्ड शिल्ड स्पर्धा खेळत असताना एडवर्ड्स दुखापतग्रस्त झाला होता. त्यानंतर त्याला स्कॅनसाठी पाठवण्यात आले. मेडिकल टीमने तपासणी केल्यानंतर त्याला विश्रांती करण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे तो आगामी आयपीएल स्पर्धेत खेळताना दिसून येणार नाही. हा सनरायझर्स हैदराबाद संघासाठी सर्वात मोठा धक्का असणार आहे.

जॅक एडवर्ड्सला आतापर्यंत ऑस्ट्रेलियाकडून पदार्पण करण्याची संधी मिळालेली नाही, पण त्याची फलंदाजी आणि गोलंदाजीतील क्षमता पाहून सनरायझर्स हैदराबादने त्याला तीन कोटींची बोली लावून आपल्या संघात स्थान दिले होते. त्याला आतापर्यंत ७७ टी-२० सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने ८५३ धावा केल्या आहेत, तर गोलंदाजी करताना त्याने ५२ गडी बाद केले आहेत.

### पॅट कमिन्स अद्याप अनफिट

जॅक एडवर्ड्स हा सनरायझर्स हैदराबाद संघातून बाहेर होणारा पहिलाच खेळाडू नाही. संघाचा कर्णधार पॅट कमिन्सदेखील अजूनपर्यंत पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे तो स्पर्धेतील सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी युवा फलंदाज इशान किशनकडे सोपवण्यात आली आहे, तर संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी अभिषेक शर्माकडे सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



# चिरले संघाने बिग बॅश ट्रॉफी जिंकली

## लोकनेते रामशेठ ठाकूर आणि सदाशिव लोखंडे यांच्या हस्ते गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर आयोजित बिग बॅश ट्रॉफी २०२६ या भव्य क्रिकेट स्पर्धेत शामस्मृती जरीमरी चिरले संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी खासदार सदाशिव लोखंडे यांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी आणि बक्षीस देऊन गौरवण्यात आले.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने शिवाजीनगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर बिग बॅश ट्रॉफी या भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत रोमहर्षक झालेल्या या स्पर्धेत शामस्मृती जरीमरी चिरले संघाने जितेंद्र स्मृती बंबावी कोळीवाडा संघावर मात करत विजेतेपद पटकावले. आदेश स्पोर्ट्स शिवाजीनगर संघाने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या संघांसह मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक यांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण हे पुढील काळात राज्यातील उत्कृष्ट खेळाडू घडवणारे केंद्र ठरणार असून विविध जिल्ह्यांमधून खेळाडू येथे खेळण्यासाठी येत आहे. त्यामुळे या मैदानाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढणार असल्याचे मत व्यक्त केले.

पारितोषिक वितरण समारंभास गजानन ठाकूर, विजय ठाकूर, वैभव ठाकूर, रोहिदास ठाकूर, शिरीष कडू, पंढरीनाथ ठाकूर, अमित कडू, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर, सुजित ठाकूर आदी उपस्थित होते.

## शर्यतीचा थरार




**मुरूड : येथील समुद्रकिनारी गुढीपाडव्याच्या निमित्ताने बैलगाडी व घोडागाडी शर्यतीचा थरार रंगला. स्पर्धेचे आयोजन हौशी मित्र मंडळाने केले होते.** (छाया : सुधीर नाझरे)

# इराणमध्ये युवा कुस्तीपटूला फाशी

**तेहरान : वृत्तसंस्था**

इराणमधील खेळाडूंवर सुरू असलेल्या दमनकारी कारवाईने संपूर्ण क्रीडा जगत हादरले आहे. आंतरराष्ट्रीय पदक विजेता १९ वर्षीय कुस्तीपटू सालेह मोहम्मदी याला इराण सरकारने फाशी दिल्याने जागतिक स्तरावर संताप व्यक्त होत आहे. या घटनेमुळे आता इराणच्या तुरुंगात असलेल्या इतर खेळाडूंच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.




सालेह मोहम्मदी याच्यावर दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या हत्येचा आरोप होता, मात्र मोहम्मदीने सुरुवातीपासूनच हे आरोप फेटाळून लावले होते. माझा कबुलीजबाब छळ करून आणि अतोनात यातना देऊन घेण्यात आला आहे, असा दावा त्याने न्यायालयात केला होता. विशेष म्हणजे, या प्रकरणातील सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या साक्षींकडेही प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप मानवाधिकार संघटनांनी केला आहे. ही घटना २०१८मधील नवीद अफकारी या कुस्तीपटूच्या फाशीच्या प्रकरणाची पुनरावृत्ती मानली जात आहे.

# जागतिक इनडोअर अॅथलेटिक्स स्पर्धा भारतात होणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताला २०२८च्या जागतिक इनडोअर अजिंक्यपद थलेटिक्स स्पर्धेच्या यजमानपदाचा मान मिळाला आहे. पोलंड येथे झालेल्या जागतिक अॅथलेटिक्स परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही स्पर्धा भुवनेश्वर येथे होईल.

‘भारताला २०२८मध्ये होणाऱ्या जागतिक इनडोअर अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे यजमानपद सोपविण्यात आले आहे,’ असे जागतिक अॅथलेटिक्सचे उपाध्यक्ष आदिल सुमारीवाला यांनी सांगिले. भारतीय अॅथलेटिक्स महासंघाने या वर्षाच्या सुरुवातीला जागतिक इनडोअर



अजिंक्यपद स्पर्धेसाठी आपली दावेदारी उपस्थित केली होती. जानेवारीमध्ये जागतिक अॅथलेटिक्सच्या दोन सदस्यीय पथकाने भुवनेश्वरच्या कलिंगा स्टेडियम परिसरातील अत्याधुनिक इनडोअर सुविधांची पाहणी केली होती.

पोलंडच्या तोरून येथे यंदाची जागतिक इनडोअर अॅथलेटिक्स स्पर्धा सुरू होण्यापूर्वी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. जागतिक इनडोअर थलेटिक्समध्ये साधारणपणे पुरुष आणि महिला खेळाडूंसाठी प्रत्येकी १३ क्रीडा प्रकारांचा समावेश असतो, ज्या तीन दिवसांच्या कालावधीत पार पडतात. या स्पर्धेच्या पोलंडमध्ये होणाऱ्या आवृत्तीमध्ये ४ बाय ४०० मीटर मिश्र रिले स्पर्धा प्रथमच आयोजित केली जाईल.






# अष्टपैलू सॅम करन यंदा आयपीएलमध्ये खेळणे कठीण

■ राजस्थानचे टेन्शन वाढले



**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएल नवा हंगाम सुरू होण्यापूर्वीच राजस्थान रॉयल्सच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले आहे. स्टार अष्टपैलू खेळाडू सॅम करन याच्या मांडीच्या स्नायूला दुखापत झाली असून या दुखापतीमुळे त्याचे यंदाच्या स्पर्धेत खेळणे कठीण मानले जात आहे.

२७ वर्षीय सॅम करन शेवटचा ५ मार्च रोजी आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेत इंग्लंडकडून खेळताना दिसला होता. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडचा पराभव केला. तेव्हापासूनच करनच्या तंदुरुस्तीबाबत चर्चा रंगली होती. आयपीएलच्या लिलावात राजस्थान रॉयल्सने रवींद्र जडेजा आणि सॅम करन यांना चेन्नई सुपर किंग्सकडून आपल्या संघात घेतले होते, तर राजस्थानचा कर्णधार संजू सॅमसन चेन्नईमध्ये दाखल झाला होता. करन पहिल्यांदाच राजस्थानकडून खेळणार असल्याने चाहत्यांना त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र अजूनही तो दुखापतीतून सावरला नसल्याचे समजत आहे. त्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या रणनीतीला मोठा तडा बसला आहे.

सॅम करनची आयपीएलमधील कारकीर्द चढ-उताराची राहिली आहे. २०१९मध्ये पंजाब किंग्समधून पदार्पण केल्यानंतर तो चेन्नईकडे गेला आणि पुन्हा २०२३मध्ये १८.५ कोटी रुपयांच्या विक्रमी बोलीवर पंजाबमध्ये परतला. २०२५मध्ये तो पुन्हा चेन्नईकडून खेळताना दिसला, मात्र तो हंगाम त्याच्यासाठी निराशाजनक ठरला. त्याने पाच सामन्यांत केवळ ११४ धावा केल्या आणि फक्त एक विकेट मिळवली.

राजस्थानने अद्याप अधिकृतपणे बदली खेळाडूची घोषणा केलेली नाही, मात्र संघ व्यवस्थापन खालील पर्यायांचा विचार करू शकते. अनुभवी अष्टपैलू म्हणून रवींद्र जडेजावर आता मोठी जबाबदारी असेल. डोनोव्हान फरेराच्या रूपाने संघाकडे एक पॉवर-हिटर आणि उपयुक्त ऑफ-स्पिनरचा पर्याय उपलब्ध आहे. सॅम करनची अनुपस्थिती भरून काढणे राजस्थानसाठी मोठे आव्हान असणार आहे. आता राजस्थान रॉयल्स कोणाला बदली खेळाडू म्हणून संधी देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **—मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com